
संस्कृत साहित्यांतील

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १४८५

# नगाधिराज हिमालय



REFBK-0013089

डॉ. के. ना. वाटवे

३६२४०
निबंध
१।७।६४
१४८५

REFBK-0013089

संस्कृत साहित्यांतील

# नगाधिराज हिमालय

डॉ. के. ना. वाटवे

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २

सव्वा रुपया

अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा
हिमालयो नाम नगाधिराजः ॥

श्री : ४४६ [ ४-६३ ]

© १९६३
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

आवृत्ति पहिली
शके १८८५
सन १९६३

मूल्य रु. १-२५

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
करितां
३, राउंड बिल्डिंग
मुंबई २

मुद्रक :
ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय
५६८, नारायण
पुणें २

# हिमालय स्तोत्र

हिमालय म्हणजे भारताच्या मस्तकावर शोभणारा तेजोमय हिमकिरीट. तो किरीट जोंवर भारताच्या मस्तकावर शोभतो आहे, तोंवर भारताचा गौरव गौरीशंकराइतका उत्तुंग राहणार. हिमालयाच्या उत्तुंगतेंत भारताच्या गौरवाची उत्तुंगता आहे, हिमालयाच्या धवलतेंत भारताच्या हृदयाची धवलता आहे, हिमालयाच्या गूढतेंत भारताच्या सामर्थ्यांची गूढता आहे आणि हिमालयाच्या निश्चलतेंत भारताच्या धर्मनिष्ठेची अभंगता आहे.

हिमालयानें आजवर भारताचें संरक्षण आणि संवर्धन केलें आहे. इतिहासाच्या प्रारंभकाळापासून अंगावर शुभ्र शेला लपेटून आणि आकाशाकडे दृष्टि रोखून तेजाची उपासना करणारा हा गिरिराज हिमालय भारताचा त्राता आहे. त्याच्या उत्तुंगतेकडे पाहून आजवर किती तरी दुष्टांचे दुष्ट संकल्प जागच्या जागीं जिरले आहेत. त्याच्याकडे पूज्य बुद्धीनें न पाहतां त्याच्यावर पाऊल ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या आक्रमकांना केवळ त्याच्या स्पर्शानें हिमसमाधि प्राप्त झाली आहे. पण भारताविषयीं मात्र त्याच्या हिमशीतल हृदयांत स्नेहाची अपार ऊब नांदत आहे. त्याच्या गिरिगव्हरांच्या आश्रयानें किती तरी ऋषिमुनींनीं तपाचे हिमालय उभारले आहेत आणि संस्कृतीची अभिवृद्धि केली आहे.

भारतीयांच्या कल्पनेप्रमाणें हिमालय हें शिवाचें वसतिस्थान आहे. किंबहुना भारतीयांनीं हिमालयालाच शिव-स्वरूप मानलें आहे. ज्याच्या सर्वांगाला भस्म चर्चिलें आहे, ज्याच्या मस्तकावर चंद्रकोर शोभते आहे आणि ज्याच्या जटेंतून गंगा प्रसवते आहे, तो कर्पूरगौर शिव साक्षात् हिमालयाच्या रूपानें उभा आहे. तो तपस्वी आहे. तो जगाच्या कल्याणासाठीं तप आचरीत आहे. तो हलाहल पचवून अमृताला जन्म देणारा आहे आणि मृत्यूवरही मात करणारा आहे. तो शिव असूनही अधर्माच्या निरवनासाठीं रुद्र बनणारा आहे. त्याच्या जटेंतून झरणारी गंगा भारतभूमीचें अंतर्बाह्य पोषण करीत आहे. गंगेच्या रूपानें जणुं हिमालयाची वात्सल्यधाराच भारताचें संगोपन करीत आहे.

हिमालय हें भारताच्या आत्म्याचें प्रतीक आहे. जोंवर हिमालय उभा आहे आणि जोंवर त्याच्या हृदयांतून प्रसवलेली गंगा वाहत आहे, तोंवर या पृथ्वीतलावर भारताची उज्ज्वल आणि सरस-रमणीय जीवनधारा वाहत-राहणार! हिमालयाविना भारत म्हणजे किरीटाविना राजा, आईविना लेकरूं, नव्हे देवाविना देऊळ !

— आनन्दयात्री

नगाधिराज हिमालय

- श्रुति-स्मृति पुराणोक्त
- रामचरित्राशीं निगडित
- महाभारताच्या आदिअंतीं
- अति पवित्र तीर्थस्थान-पुण्यक्षेत्र
- कविकुलगुरु कालिदासाचें आकर्षण
- पार्वती-परमेश्वराचें निवासस्थान
- युद्धभूमि नि विलासभूमीहि
- महाकवि भारवीचें वैशिष्ट्यपूर्ण वर्णन
- बाणभट्टाचें विलक्षण आकर्षण
- भर्तृहरीचें विश्रामस्थान

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर.

# संस्कृत वाङ्मयांतील नगाधिराज हिमालय

नगाधिराज हिमालय ! पण तो केवळ नगांचा म्हणजे पर्वतांचाच अधिराज नाहीं. तर तो कोट्यवधि भारतीयांच्या हृदयांचा अधिराज आहे. वेदकालापासून आजपावेतों अनेक सहस्र वर्षें तो भारतीय अन्तःकरणांवर अबाधित सत्ता गाजवीत आहे. श्रुतिस्मृतिपुराणें यांच्या काळांत तो ऋषिमुनींच्या नेत्रांसमोर भारतीय सीमेची खूण म्हणून आपल्या उन्नत शिखरांसह उभा आहे. रामायण-महाभारतांत तर एक तपोभूमि, यज्ञभूमि, युद्धभूमि आणि मोक्षक्षेत्र या नात्यांनीं तो भारतीयांच्या हृदयांत शिरला आहे. कालिदास-भारवि-बाण इत्यादि प्रतिभावंतांच्या कल्पनेंत तो एका रम्य विलासभूमीच्या रूपांत अवतरला आहे. त्यामुळें सर्वच भारतीयांच्या श्रद्धेला, भावनेला नि कल्पनेला तो एक विलक्षण आकर्षणाचा विषय होऊन राहिला आहे.

आमच्या धार्मिक, बौद्धिक, सांस्कृतिक आणि भौतिक जीवनांत जें म्हणून भव्य, उदात्त, मंगल आणि रमणीय आहे त्याची स्थापना मोठ्या कल्पकतेनें आम्ही हिमालयावर केली आहे. जीवनाची प्रेरणा व मरणांतील शांति आम्हांला हिमालयाकडून मिळते. आमचे आदर्श वीर पांडव यांनीं शस्त्रांची विद्या येथेंच संपादन केली व आपले देह अखेरीस ठेवले ते याच पवित्र भूमींत जपी, तपी, शास्त्रज्ञ, गिर्यारोहक, कवि, विलासी किंवा विरक्त कोणीहि असो त्याला हिमालयाची सारखीच ओढ आहे. तात्पर्य,

हिमालय आमच्या रक्तांत मुरला आहे, श्वासोच्छ्‌वासांत भरला आहे आणि कल्पनेंत विरला आहे. हिमालय हा भारतीय जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. हिमालयापासून वियोग म्हणजे भारतीयांना जीवनापासून वियोग वाटतो.

अशा या अनन्यसामान्य नगाधिराजाचें संस्कृत वाङ्मयद्वारां होणारें दर्शन घडविण्याचा प्रयत्न येथें केला आहे. आणि तें देखील मोहक कथांनीं आणि सुंदर कविकल्पनांनीं नटलेल्या प्राचीनांच्या प्रासादिक वाणीनें.

■ ■ ■

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 32220 वि: [illegible]
क्रमांक 9824 नों दि [illegible]

हिमालय अत्यंत प्राचीन काळच्या भारतीय आर्यांच्या परिचयाचा आहे. ते त्याला 'हिमवान' म्हणतात. देशांच्या सीमा दाखवणारा, उपयुक्त औषधि असलेला आणि यज्ञांत भाग घेणारा म्हणून वेदवाङ्मयांत हिमवानाचा उल्लेख आहे.

१. **तस्मादेतस्यामुदीच्यां दिशि ये के च परेण हिमवन्तं जनपदा उत्तरकुरव उत्तरमद्रा इति ।** ( ऐ. ब्रा. ८.१४ )

उत्तर दिशेला हिमालयाच्यां पलीकडे जे उत्तर कुरु व मद्र देश आहेत —

२. **यत्ते सुजाते हिमवत्सु भेषजम् ।** ( तैत्तरीय ब्रा. २.५.६.४ )

हिमालयांत उत्पन्न झालेलें ( हें ) तुझें रोगनाशक औषध आहे.

३. **यदाञ्जनं त्रैककुदं जातꣳ हिमवतस्परि । तेन वामाञ्चे मयि पर्वतवर्चसमस्तु इति ।** ( तैत्तरीय आ. ६. १०. २ )

हिमालयांत उत्पन्न झालेल्या या औषधानें मला पर्वताचें बळ येवो.

४. **निर्ऋत्या अश्वतर गर्दभौ । हिमवतो हस्तिनम् ।** ( तै.आ. ३.१०.३ ) **सोमस्य राज्ञः कुरङ्गः, इन्दोः शृङ्गी, समुद्रस्य शिशुमारो हिमवतो हस्ती ।**

यांत इतरांबरोबर हिमालयाला हत्ती हा यज्ञभाग देत असत असें सांगितलें आहे.

५. **यस्येमे हिमवन्तो महित्वा यस्य समुद्रं रसया सदाहुः । यस्येमाः प्रदिशो यस्य बाहू कस्मै देवाय हविषा विधेम ॥** ( ऋ.१०.१२१.४ )

ऋग्वेदांतील या ऋचत 'हिमवन्तः' हा बहुवचनी शब्द 'पर्वताः' या अर्थी योजला आहे. म्हणजे येथें हिमालय हें विशिष्ट पर्वतवाचक नांव सामान्यवाचक झालेलें आहे. येथें पर्वत, दिशा वगैरे त्या विशाल ( क ) देवाचेच विभाग कल्पिलेले आहेत.

स्मृति आणि कांहीं पुराणें यांच्यामध्यें जे हिमालयाचे उल्लेख येतात ते प्रायः देशांची सीमा दाखवणारी एक खूण म्हणून. उदाहरणार्थ, मनुस्मृतीमध्यें ( अध्याय २ : २१–२२ ) 'मध्यदेश' आणि 'आर्यावर्त' यांच्या चतुःसीमा दिलेल्या आहेत. हिमालय आणि विंध्य यांच्यामध्यें विनशनाच्या पूर्वेस व प्रयागाच्या पश्चिमेस जो देश आहे त्याला 'मध्यदेश' म्हणतात. तसेंच पूर्वसमुद्रापासून पश्चिमसमुद्रापर्यंतचा जो या दोन पर्वतांमधील प्रदेश त्यास 'आर्यावर्त' असें म्हणतात.

**हिमवद्विंध्ययोर्मध्यं यत्प्राग्विनशनादपि ।**
**प्रत्यगेव प्रयागाच्च मध्यदेशः प्रकीर्तितः ॥**
**आसमुद्रात्तु वै पूर्वादासमुद्रात्तु पश्चिमात् ।**
**तयोरेवान्तरं गिर्योरार्यावर्तं विदुर्बुधाः ॥**

भासानें ( इ. स. पू. ३०० ) आपल्या 'स्वप्नवासवदत्ता' व 'बालचरित' या नाटकांचें भरतवाक्य म्हणून खालील श्लोक दिला आहे. त्यांत हिमालय आणि विंध्य हीं दोन पृथ्वीचीं कुंडलें आहेत असें म्हटलें आहे व सागरापर्यंत पसरलेल्या अशा या पृथ्वीचें एकछत्री साम्राज्य राजसिंह करो, अशी इच्छा प्रकट केली आहे.

**इमां सागरपर्यन्तां हिमवद्विंध्यकुण्डलाम् ।**
**महीमेकातपत्राङ्कां राजसिंहः प्रशास्तु नः ॥**

हिमालयाचा उल्लेख करून भारताची सीमा विष्णुपुराणांत पुढीलप्रमाणें सांगितली आहे. ( विष्णुपुराण २ : ३.१ )

**उत्तरं यत्समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणं ।**
**वर्षं तद्भारतं नाम भारती यत्र सन्ततिः ॥**

हिमालयाच्या दक्षिणेचें व समुद्राच्या उत्तरेचें तें भारतवर्ष हें नांव कां पडलें हें सांगतांना लिंगपुराणांत म्हटलें आहे कीं, हिमालयाच्या दक्षिणेकडे असणारा प्रदेश भरताला दिला म्हणून त्याला भारतवर्ष म्हणतात. वर्ष म्हणजे देश. (लिंग. अ. ४७.२३ )

**हिमाद्रेर्दक्षिणं वर्षं भरताय न्यवेदयत् ।**
**तस्मत्तु भारतं वर्षं तस्य नाम्ना विदुर्बुधाः ॥**

ब्रह्मांडपुराणांत ब्रह्मदेवानें हिमालयाला पर्वतांचा अधिपति केल्याचा उल्लेख आहे.

**शैलानां हिमवन्तं च नदीनां चैव सागरम् ।**
**गन्धर्वाणामधिपतिं चक्रे चित्ररथं विधिः ॥**

पृथु राजानें पृथ्वीचें दोहन केलें, त्या वेळीं हिमालयाला वत्स करण्यांत आलें होतें याचा उल्लेख विष्णु, भागवत इत्यादि पुराणांत आहे.

**गौर्भूमिरचलाः सर्वे कर्तारोऽत्र पयांसि च ।**
**ओषध्यश्चैव भास्वन्ति रत्नानि विविधानि च ।**
**वत्सश्च हिमवानासीद्दोग्धा मेरुर्महागिरिः ।**

लोहित नांवाच्या हिमालयावरील सरोवरांत उगम पावून कैलासाच्या उतरणीवरून ब्रह्मपुत्रनद खालील प्रदेशावर आला. त्याला मग लोहित्य म्हणूं लागले, असा उल्लेख कालिकापुराणांत आढळतो.

ब्रह्मकुण्डात्सुतः सोऽथ कासारे लोहिताह्वये
कैलासोपत्यकायां तु न्यपतत् ब्रह्मणः सुतः ॥

हरिवंश ( १.१८ ) आणि मत्स्य या पुराणांत हिमवत् ही एक देवता असून त्याला पितरांची कन्या मेना दिलेली होती, या दांपत्याला क्रौंच व मैनाक असे दोन पुत्र होते व अपर्णा ( पार्वती ) एकपर्णा व एकपाटला या कन्या असून त्या शंकर, आसित व जैगीषव्य यांस अनुक्रमें दिल्या होत्या असें सांगितलें आहे. परशुरामानें हिमालयावरच शंकराकडून धनुर्वेद घेतला. ( रेणु. १५ ). तारकासुरवधापूर्वी कार्तिकेयाला देवांनीं जो सेनापति म्हणून अभिषेक केला तो क्रौंच पर्वतावरच. ( ब्रह्मांड. ३.१० ). नरनारायण हे अवतारी पुरुष बदरीकाश्रमांत रहात होते ही कथा भागवत ( ११ : ४.७ ) मध्यें सांगितली आहे. यासंबंधानें कैलास-गाथेंत म्हटलें आहे : " नरनारायण ऋषीश्वर। जे भगवंताचे अवतार। वसती जेथ निरंतर। तपश्चर्या कारणें। " ( १.४० )

प्रसिद्ध राजा मांधाता यानें हिमालयांतच यज्ञ केले अशी समजूत आहे. त्यावरून गुर्लामांधाता असें नांव एका शिखरास प्राप्त झालें आहे. हिमालयाचें 'हिमवत्' हें नांवच प्राचीन संस्कृत वाङ्मयांत प्रायः आढळतें. कालिदासादि अभिजात कवींनीं हिमालय हिमाचल, तुहिनाद्रि, तुषाराद्रि, गौरीगुरु, प्रालेयाद्रि, हिमनग, उदगद्रि इत्यादि नांवें रूढ केलीं.

आदिकवि वाल्मीकि यांनीं आपल्या रामायणांत कैलास पर्वत, मानस सरोवर आणि खुद्द हिमालय यांचे पुढील उल्लेख केले आहेत.

■ ■ ■

## रामचरित्राशीं निगडित

एकदां विश्वामित्र रामाला घेऊन शरयू नदीतीरावर गेले. शरयू नदी उतरून ते पलीकडे गेले. तेथील नदीच्या पाण्याचा गंभीर घोष ऐकून रामानें विश्वामित्रास हा असा ध्वनि कां निघतो असें विचारलें. तेव्हां विश्वामित्रानें त्याला शरयू ही कैलास पर्वताजवळील मानस सरोवरांतून कशी निघाली आहे व जाह्नवीशीं तिचा कसा संबंध आहे हें पुढील शब्दांत सांगितलें आहे. विश्वामित्र म्हणतात, "ब्रह्मदेवानें आपल्या मनापासून हें सरोवर निर्माण केलें असल्यानें त्यास मानस सरोवर असें म्हणतात. या सरोवरांतूनच शरयूचा उगम असून तेथूनच ती अयोध्येला आली आहे."

**कैलासपर्वते राम मनसा निर्मितं परम् ।**
**ब्रह्मणा नरशार्दूल तेनेदं मानसं सरः ॥**
**तस्मात्सुस्राव सरसः सायोध्यामुपगूहते ।**
**सरःप्रवृत्ता सरयूः पुण्य ब्रह्मसरश्च्युता ॥**
**तस्यायमतुलः शब्दो जाह्नवीमभिवर्तते ।**
**वारिसंक्षोभजो राम प्रणामं नियतः कुरु ॥**

(बालकांड २४.८.१०)

रामाच्या प्रश्नावरून विश्वामित्रांनीं रामाचा पूर्वज सगर राजा याची कथा सांगितली व त्याचाच वंशज भगीरथ यानें स्वर्गलोकींची गंगा पृथ्वीवर कशी आणली ही गंगावतरणाची कथाहि निवेदिली आहे. त्यामध्यें हिमालयाचे साक्षात् उल्लेख आहेत. पूर्वी सगर नांवाचा एक प्रजावत्सल आणि धार्मिक राजा होता. त्याला केशिनी व सुमति अशा दोन पत्न्या होत्या. आपणांस संतति

नाहीं म्हणून त्यानें हिमालयांत जाऊन शंभर वर्षें तप केलें व त्या हिमालयांतच भृगूनें त्याला पुत्रप्राप्तीचा वर दिला.

**ताभ्यां सह महाराजः पत्नीभ्यां तप्तवांस्तपः ।**
**हिमवन्तं समासाद्य भृगुप्रस्रवणे गिरौ ॥**
**अथ वर्षशते पूर्णे तपसाराधितो मुनिः ।**
**सगराय वरं प्रादाद्भृगुः सत्यवतां वरः ॥**

( बालकांड ३८.५.६ )

भृगूच्या वरामुळें केशिनीला एकच पुत्र झाला. त्याचें नांव असमंजस. आणि सुमतीला ६० हजार पुत्र झाले. असमंजस हा पापी निघाला म्हणून पित्यानें त्याचा त्याग केला. असमंजसाला अंशुमान नांवाचा गुणवान पुत्र झाला. एकदां सगरानें हिमालय आणि विंध्य या दोन पर्वतांमध्यें अश्वमेध यज्ञ आरंभिला.

**शंकरश्वशुरो नाम्ना हिमवानिति विश्रुतः ।**
**विन्ध्यपर्वतमासाद्य निरीक्षेते परस्परम् ॥**
**तयोर्मध्ये समभवद्यज्ञः स पुरुषोत्तमः ।**
**स हि देशो नरव्याघ्र प्रशस्तो यज्ञकर्मणि ॥**

( बालकांड ३९ : ४ ते ६ )

त्या यज्ञाचा घोडा इंद्रानें पळविला व पाताळांत कपिल ऋषि तप करीत बसले होते तेथें नेऊन तो सोडला. त्या घोड्याचा शोध करीत ६० हजार सगरपुत्र निघाले. त्यांनीं धरित्री खणली त्यामुळेंच सागर निर्माण झाला व ते पाताळांत गेले. तेथें त्यांना त्यांचा यज्ञाचा घोडा दिसला. कपिल हा चोर आहे असें समजून त्या सगरपुत्रांनीं त्याचा अपमान केला. तेव्हां रागावलेल्या कपिलानें

त्यांना जाळून भस्म केलें. या साठ हजार पुत्रांचा उद्धार फक्त गंगाजलाच्या सिंचनानेंच होणार होता. आपल्या चुलत्यांचा उद्धार करण्याचें हें महाकठिण कर्म अंशुमानानें अंगावर घेतलें. दरम्यान सगर मृत्यु पावला.

अंशुमानाला दिलीप नांवाचा एक पुत्र होता. त्याच्यावर राज्यकारभार सोपवून ३२ हजार वर्षेंपर्यंत त्यानें हिमालयाच्या शिखरावर दारुण तप केलें. ( हिमवत् शिखरे रम्ये तपस्तेपे सुदारुणम्। ) तरी त्याला त्या तपाचें इष्ट फळ मिळालें नाहीं. दिलीपाला भगीरथ नांवाचा एक मुलगा झाला. दिलीपानें तीस हजार वर्षेंपर्यंत अनेक यज्ञ केले व तो मृत्यु पावला. आतां भगीरथ राजा झाला होता. त्यानें गंगावतरण करण्याचें हें कुल-परंपरागत व्रत घेतलें व त्यानें हिमालयांतच दीर्घ तप केलें. ब्रह्मदेव त्याच्या तपानें प्रसन्न झाला व त्यानें त्याला सांगितलें कीं, तुला पाहिजे असलेली गंगा मिळेल, मात्र तिचा वेग धारण करण्यास तूं शंकराला विनंती कर.

**इयं हैमवती ज्येष्ठा गङ्गा हिमवतः सुता।**
**तां वै धारयितुं राजन्हरस्तत्र नियुज्यताम्॥**

( बालकांड ४२.२३ )

याप्रमाणें शंकरानें आपल्या जटेमध्यें गंगेचा समावेश करून घेतला व त्यानें तिला बिंदु सरोवरामध्यें सोडलें. त्यामुळें बिंदु सरोवरांतून पाण्याचे सात प्रवाह निघाले.

**विससर्ज ततो गङ्गां हरो बिन्दुसरः प्रति।**
**तस्यां विसृज्यमानायां सप्त स्रोतांसि जज्ञिरे॥**

( बालकांड ४३.११ )

यानंतर गंगा भगीरथाच्या इच्छेप्रमाणें पाताळांत गेली व तिच्या पवित्र स्पर्शानें सगराचे साठ हजार पुत्र उद्धरून गेले. हें परम पावन गंगावतरण हिमालय पर्वतांत झालेलें आहे. व्यासांनींहि आपल्या वनपर्वांत हिमालयांत झालेल्या ह्या गंगावतरणाची कथा अध्याय १०८ व १०९ या ठिकाणीं सविस्तर दिलेली आहे.

वानरांनीं सीतेच्या शोधार्थ जे प्रदेश धुंडाळले त्यांत हिमालयाचा उल्लेख सुंदरकांडांत सांपडतो.

रामायणाच्या उत्तरकांडांत ( अ. १६ ) रावणानें कैलास पर्वत गदगदा हालविल्याचा उल्लेख आहे. कैलास पर्वताजवळ विमानानें रावण आला असतां शरवनापाशीं त्याचें विमान कुण्ठित झालें. तेथें रखवालीस असणाऱ्या नंदीचा रावणानें उपहास केला म्हणून नंदीनें त्याला " तुझा वानराकडून पराभव होईल " असा शाप दिला. त्यामुळें संतापानें त्यानें कैलास गदगदा हलविला.

**पुष्पकस्य गतिश्छिन्ना यत्कृते मम गच्छत ।**
**तमिमं शैलमुन्मूलं करोमि तव गोपते ॥**
**एवमुक्त्वा ततो राम भुजान् विक्षिप्य पर्वते ।**
**तोलयामास तं शीघ्रं स शैलः समकम्पत ॥**

पण शंकरानें पायाच्या अंगठ्यानें तो पर्वत दाबतांच रावण त्याखालीं सांपडून ओरडूं लागला. शेवटीं सामगायनानें त्यानें शंकरास प्रसन्न केलें. याचा उल्लेख कालिदासानें 'रघु' ४.८० मध्यें केला आहे आणि श्रीहर्षानेंहि 'प्रियप्रदर्शिके'च्या नांदींत ही कथा उल्लेखिली आहे.

तसेंच माघानेंहि आपल्या 'शिशुपालवधां'त कैलासाची ही कथा उल्लेखिली आहे. ( शि. १.५० )

**समुत्क्षिपन्यः पृथिवीभृतां वरं वरप्रदानस्य चकार शूलिनः ।**
**त्रसत्तुषाराद्रिसुतासंभ्रमस्वयंग्रहाश्लेषसुखेन निष्क्रयम् ॥**

शंकरानें दिलेल्या वरप्रदानाची परतफेड रावणानें अशी केली कीं, कैलासाच्या हालण्यामुळें भ्यालेल्या हिमालय-कन्येला ( पार्वतीला ) आपण होऊन शंकराच्या गळ्यांत मिठी मारावयास लावलें.

■ ■ ■

## महाभारताच्या आदि-अंतीं

व्यासांनीं आपल्या महाभारतांत हिमालयाचा अनेक ठिकाणीं उल्लेख केलेला आहे. भव्यता, पावित्र्य, समृद्धि आणि ऐश्वर्य यांचें एक स्थळ अशीच व्यासांची हिमालयाविषयीं धारणा आहे व सर्व भारतीयांचीहि तशीच भावना झालेली असल्यानें महर्षि व्यासांनीं आपलें महाभारत गणेशास लेखक करून हिमालयाच्या उन्नत शिखरावर लिहिलें असें ते मानतात.

**ग्रन्थसम्राट् महाभारत । येथेंचि रची पराशरसुत ।**
**दिव्य ग्रंथ भागवत । जन्म घेई येथेंचि ॥**

( कैलासगाथा १.५० )

आतां महाभारतांतील हिमालयासंबंधींचे कांहीं उल्लेख पाहूं.

महाभारताच्या सभापर्वांत पुढील प्रसंग आहे. अर्जुन व कृष्ण हे खांडववन जाळीत असतां त्या प्रलयांत मय नांवाचा एक शिल्पकार सांपडला. हा मय अतिशय सुंदर अशा इमारती

बांधण्यांत मोठा कुशल होता. त्यानें दयेची याचना केल्यानंतर कृष्णार्जुनांनीं त्यास जीवदान दिलें. या उपकाराची परतफेड म्हणून मयानें पांडवांसाठीं एक सभा बांधून देण्याचें कबूल केलें. या सभेसाठीं लागणारी सामग्री मयाला हिमालयांतून आणवावयाची होती. मयानें वृषपर्व्यांसाठीं एक सभा तेथें बांधलेली होती. त्या सभेस लागणारी सामग्री बिंदु सरोवरामध्यें होती. म्हणून हिमालयांतील कैलास आणि मैनाक पर्वताच्या जवळच्या प्रदेशांत मय गेला व तेथील सामग्री आणून त्यानें ती बांधली. याबद्दल सभापर्वांत पुढील श्लोक आहेत. ( अध्याय ३, श्लोक ९ ते १२ )

**अथोत्तरेण कैलासान्मैनाकं पर्वतं प्रति ।**
**हिरण्यशृङ्गः सुमहान्महामणिमयो गिरिः ॥**
**रम्यं बिन्दुसरो नाम यत्र राजा भगीरथः ।**
**द्रष्टुं भागीरथीं गङ्गामुवास बहुलाः समाः ॥**
**यत्रेष्टं सर्वभूतानामीश्वरेण महात्मना ।**
**आहृताः क्रतवो मुख्याः शतं भरतसत्तम ।**
**यत्र यूपा मणिमयाश्चैत्याश्चापि हिरण्मयाः ॥**

नरनारायणांनीं याच ठिकाणीं तप केलें असें पुढें सांगितलें आहे. " नरनारायणौ ब्रह्मा यमःस्थाणुश्च पंचमः । उपासते यत्र सत्रम् सहस्रयुगपर्यंये ॥ " या ठिकाणचें सभाद्रव्य नेऊन मयानें पांडवांची अत्यंत अपूर्व अशी सभा बांधली. या सभेमध्यें पाणी नसेल तेथें पाणी आहे व असेल तेथें नाहीं असा विलक्षण भास होत असे. या भासामुळेंच दुर्योधन चकला व हा अंधपुत्र आहे असें द्रौपदी त्याला हिणवण्यासाठीं म्हणाली; आणि हा द्रौपदीनें केलेला उपहास

कुरुकुलाला कसा घातक ठरला, हें सर्वांना माहीत आहेच. हिमालय हें एक तपस्येचें, यज्ञ करण्याचें आणि भौतिक समृद्धीचें ठिकाण आहे असें व्यासांच्या वरील उल्लेखावरून दिसून येईल.

हिमालय ही केवळ तप व यज्ञ करण्याचीच भूमि नव्हे, तर ती शस्त्रसाधनेचीहि भूमि आहे, ही गोष्ट व्यासांनीं सांगितली आहे. अर्जुनाला शंकराकडून जें पाशुपतास्त्र मिळालें तें हिमालयावरच. त्या अस्त्रसंपादनाची हकीकत अशी आहे: पांडव वनवासांत असतां द्वैत वनांत रहात होते. तेथें ते सुखदु:खाच्या गोष्टी बोलत बसले असतां द्रौपदी व भीम यांनीं धर्माच्या पडखाऊ धोरणाबद्दल त्याची निर्भर्त्सना केली. धर्माचें क्षमेचें व शांततेचें धोरण त्या दोघांनाहि मान्य नव्हतें. धर्महि आपली बाजू त्या दोघांना समजावून सांगत होता. इतक्यांत भगवान् व्यास तेथें आले. त्यांनीं धर्माला 'प्रतिस्मृति' नांवाची विद्या दिली व सांगितलें कीं, "कौरवांचा पक्ष त्यांच्याकडे असणाऱ्या शस्त्रास्त्रांमुळें अधिक प्रबल आहे. त्यासाठीं अर्जुनानें हिमालयावर जाऊन तपानें इंद्रास वश करून घ्यावें व त्याच्या कृपाप्रसादानें शंकराकडून शस्त्रास्त्रें मिळवावींत. असा संदेश देऊन व्यास महर्षि निघून गेल्यावर युधिष्ठिरानें आपल्याला व्यासाकडून मिळालेली प्रतिस्मृति विद्या अर्जुनाला दिली व त्याला सांगितलें कीं, "अर्जुना, आमची सर्व मदार तुझ्यावर आहे. तूं आम्हांला अत्यंत प्रिय असून आमचा सर्व भार तुझ्यावर आहे. तूं आतां उत्तर दिशेकडे तपासाठीं जा."

अर्जुन निघाला असतां द्रौपदीनें त्याला आपल्या अपमानाची आठवण करून दिली व ती त्याला म्हणाली, "हे पार्था, तुम्ही

लवकरच शस्त्रास्त्रसंपन्न होऊन या व माझें मनःशल्य दूर करा. " सगळ्यांचा निरोप घेऊन व धर्माला नमस्कार करून अर्जुन तपस्येसाठीं हिमालय पर्वताकडे निघाला. हिमालयावर येऊन त्यानें गंधमादन नांवाचें वन ओलांडलें व तो इंद्रकील पर्वतावर आला. ( वनपर्व ३७ : ४१. ४२ )

**हिमवन्तमतिक्रम्य गन्धमादनमेव च ।**
**अत्यक्रामत्स दुर्गाणि दिवारात्रमतन्द्रितः ॥**
**इन्द्रकीलं समासाद्य ततोऽतिष्ठद्धनंजयः ।**
**अन्तरिक्षेति शुश्राव तिष्ठेति स वचस्तदा ॥**

त्या ठिकाणीं एका ब्राह्मणाच्या रूपांत इंद्र त्याला भेटला. त्यानें अर्जुनाच्या हेतूची परीक्षा केली. पण अर्जुनाचा सद्हेतु कळल्यावर इंद्र त्याच्यावर प्रसन्न झाला व त्याला म्हणाला, " याच हिमालयाच्या पुण्यपावन प्रदेशावर तूं तप कर. नंतर शूलधारी भगवान् शिव तुला दर्शन देईल व तुजवर प्रसन्न झाल्यावर आपल्याकडील दिव्य अस्त्रें तुला देईल. " इंद्राची आज्ञा घेऊन अर्जुन तसाच उत्तरेकडे निघाला व त्याला तेथें एक सुंदर वन लागलें. तें वन नाना प्रकारच्या पुष्पफलांनीं भरलेलें असून त्याच्यामध्यें अनेक पशुपक्षी रहात होते. तेथें सिद्ध आणि चारण संचार करीत असत. साधा मानव मात्र तेथें कोठेंच दिसत नव्हता. तिथल्या नद्यांना विपुल पाणी असून त्या पाण्यामध्यें भोंवरे तयार झालेले होते. इंद्रनील मण्याची झांक त्या पाण्यावर झळकत असे. हंस, कारंड, सारस, कोकिळा, क्रौंच आणि मोर हे त्या नदीतीरावर आढळून येत असत ( वन. ३८ : १३ ते २४ ).

दिशं ह्युदीचीं कौरव्यो हिमवच्छिखरं प्रति ।
ऐन्द्रिः स्थिरमना राजन्सर्वलोकमहारथः ॥

शुशुभे हिमवत्पृष्ठे वसमानोर्जुनस्तदा ।
तत्रापश्यद्द्रुमान्फुल्लान्विहगैर्वल्गुनादितान् ॥

नदीश्च विपुलावर्ता वैदूर्यविमलप्रभाः ।
हंसकारण्डवोद्गीताः सारसाभिरुतास्तथा ॥

पुंस्कोकिलरुताश्चैव क्रौञ्चबर्हिणनादिताः ।
मनोहर वनोपेतास्तास्मिन्नतिरथोर्जुनः ॥

पुण्यशीतामलजलाः पश्यन्प्रीतमनाभवत् ॥
रमणीये वनोद्देशे रममाणोर्जुनस्तदा ।
तपस्युग्रे वर्तमान उग्रतेजा महामनाः ॥

हिमालयावरील या रम्य वनांत अर्जुनानें खडतर तप केलें. त्यामुळें तेथें रहाणारे ऋषिमुनी त्या उग्र तपश्चर्येला भिऊन शंकराकडे गेले व या विघ्नाचें निवारण करा असें म्हणूं लागले. त्यावर भगवान् शंकरांनीं त्या सर्वांना आश्वासन दिलें आणि सांगितलें कीं, " हा अर्जुन ज्या हेतूनें तप करीत आहे तो हेतु मला माहीत आहे. त्याचा तो हेतु मी योग्य वेळीं सफल करीन. आपण या बाबतींत कांहीं चिंता करूं नये. " नंतर कांहीं दिवसांनीं भगवान् शंकरांनीं किराताचा वेष धारण केला व किरातपत्नीचा वेष धारण करणाऱ्या उमेसह जेथें अर्जुन तप करीत होता तेथें ते आले. मूक नांवाचा एक दानव वराहाचें रूप घेऊन अर्जुनावर चाल करून जात होता. तो आपल्यावर चाल करून येत आहे असें पहातांच अर्जुनानें गाण्डीव धनुष्यास बाण लावून तो त्या वराहावर

सोडला. अगदीं त्याच क्षणीं किरातवेषधारी शंकरांनीं वराहावर एक बाण टाकला. त्या दोन्ही भयंकर बाणांनीं विद्ध झालेला वराह कोसळलेल्या कड्यासारखा जमिनीवर पडला व गतप्राण झाला.

मारलेला वराह कोणाचा आणि बाण आधीं कोणी मारला यासंबंधांत अर्जुन आणि किरात यांच्यामध्यें वाद उत्पन्न झाला व दोघेहि युद्धास प्रवृत्त झाले. दोघांनींहि एकमेकांवर भयंकर बाण सोडले. अर्जुनानें सोडलेल्या बाणांचा किरातावर कांहींच परिणाम होत नाहीं असें पाहून अर्जुनाला वाटलें कीं, हा दिसतो तसा साधा किरात नाहीं. त्यानंतर पुन्हा अर्जुन आणि किरात यांचें भयंकर युद्ध झालें. बाणांचें युद्ध संपल्यावर दोघे एकमेकांवर मुष्ट्याघात करूं लागले. पण अर्जुनाचा किरातापुढें कांहीं निभाव लागेना. तेव्हां हा किरात नसून भगवान् शंकर आहे असें अर्जुनाच्या मनांत आलें व त्यानें त्याचे पाय धरले. यावर संतुष्ट झालेले शंकर त्याला म्हणाले, " अरे फल्गुना, तुझ्या या युद्धकर्मामुळें आणि तुझ्या या शौर्यधैर्यामुळें मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें. तुझ्यासारखा क्षत्रिय सबंध पृथ्वीवर नाहीं. मी तुला जीं शस्त्रास्त्रें देणार आहें तीं पेलण्यास तूं समर्थ आहेस किंवा नाहींस हेंच मला पहावयाचें होतें. तूं आज आपली ती योग्यता सिद्ध केलेली आहेस. तरी मी तुला अत्यंत अजिंक्य आणि सर्वनाशकर असें पाशुपतास्त्र देतों. "

असें म्हणून तें अस्त्र त्यांनीं अर्जुनाला दिलें व " तुझा विजय असो " असा आशीर्वाद देऊन शंकर उमेसह कैलास पर्वतावर निघून गेले. शंकराच्या या कृपाप्रसादानंतर इंद्र, वरुण, कुबेर हे अर्जुनाकडे आले व त्यांनीं त्याच्यावर अनुग्रह करून त्याला यश

चिंतिलें. अशा तऱ्हेनें कृतार्थ झालेला अर्जुन नंतर इंद्राच्या बोलावण्यावरून स्वर्गलोकींहि जाऊन आला.

■ ■ ■

## अति पवित्र तीर्थस्थान-पुण्यक्षेत्र

महाभारतांत व्यासांनीं हिमालयाची पराकाष्ठेची धार्मिक योग्यता वर्णन केलेली आहे. तो पर्वत म्हणजे साधा जड पदार्थ नसून ती भगवान् श्रीकृष्णाची एक विभूति आहे, असें महाभारतांत गीतेमध्यें सांगितलेलें आहे. भगवान् अर्जुनाला सांगतात, " मी स्थावर पदार्थांतील हिमालय आहें." ( स्थावराणाम् हिमालयः । गीता १०.२५ ) येथें लक्षांत ठेवावयाची महत्त्वाची गोष्ट अशी कीं, याच अध्यायांत भगवंतांनीं सांगितलेल्या आपल्या आणखी पांच विभूति म्हणजे स्कंद, जाह्नवी, मेरु, कुबेर व शंकर या हिमालयाच्या प्रदेशांतच आहेत व त्याबद्दल भगवंतांनीं असें म्हटलें आहे कीं : वित्तेशो ( कुबेर ) यक्षरक्षसाम् । ( १०.२३ ) सेनानीनाम् अहं स्कंदः । ( १०.२४ ) स्रोतसां अस्मि जाह्नवी । ( १०.३१ ) । मेरुः शिखरिणामहम् । ( १०.२३ ) रुद्राणां शंकरश्चास्मि । ( १०.२३ )

या कारणासाठींच हिमालयाला पराकाष्ठेचें पावित्र्य प्राप्त झालेलें आहे. तें एक तीर्थस्थान आहे, तें एक अत्यंत पुण्यक्षेत्र आहे अशी त्याची ख्याति फार प्राचीन काळापासून आहे. ऐहिक व पारलौकिक कल्याण साधण्यासाठीं ज्या धर्माचें आचरण करावयाचें त्यांत तीर्थयात्रांना फार महत्त्व आहे. तीर्थयात्रेनें पारलौकिक कल्याण तर होतेंच, पण सबंध भरतखण्डभर असलेल्या तीर्थांची

यात्रा केली असतांना आपल्या मायभूमीचें दर्शन होतें व ठिकठिकाणचे लोकाचार कळतात. हिमालय हें पार्वतीपरमेश्वराचें अत्यंत प्रिय निवासस्थान आहे. याच हिमालयांतून सिंधु, शतद्रु, यमुना, गंगा, ब्रह्मपुत्रा, गण्डकी आणि शरयू या सात नद्या उगम पावल्या आहेत. तसेंच येथें श्रीबद्रीनारायण, केदारेश्वर, गंगोत्री, जम्नोत्री इत्यादि क्षेत्रें आहेत.

आजहि निखिल भारतांत वैदिक पद्धतीचा विवाह चालला असतां कांहीं पुण्यपावन मंगलाष्टकें म्हणून वधूवरांच्या मस्तकावर मंत्राक्षता टाकण्यांत येतात. अशा नेहमीं म्हटल्या जाणाऱ्या मंगलाष्टकांत भरतवर्षांतील पवित्र नद्यांचीं नांवें आहेत. आणि या सर्व पवित्र नद्या वधूवरांचें मंगल करोत अशी इच्छा त्यांत प्रकट केली आहे. तें मंगलाष्टक असें :

**गंगा सिंधु सरस्वती च यमुना गोदावरी नर्मदा ।**
**कावेरी शरयू महेन्द्रतनया चर्मण्वती वेदिका ॥**
**क्षिप्रा वेत्रवती महासुरनदी ख्याता च या गण्डकी ।**
**पूर्णा पूर्णजलैः समुद्रसहिताः कुर्वन्तु वो मङ्गलम् ॥**

या मंगलाष्टकांत परिगणित केलेल्या नद्यांपैकीं पांच नद्या हिमालयांत उगम पावणाऱ्या आहेत. यावरून हिमालय पर्वताच्या पावित्र्याचा संबंध भारतीयांच्या धार्मिक जीवनाशीं कसा घनिष्टपणानें येतो हें दिसून येईल.

हिमालयाचें तीर्थक्षेत्र या दृष्टीनें असलेलें हें महत्त्व प्राचीन काळापासून आहे. “ हिमवत्सदृशं पुण्यं तपःस्थानं घटोद्भव । नास्ति नास्ति रसामध्ये चतुर्वर्गफलप्रदम् ॥ ” म्हणजे पृथ्वीवर धर्म, अर्थ,

काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ साधून देणारें व तप करण्यास योग्य असें हिमालयासारखें दुसरें स्थल नाहीं, हें पुराणान्तरीं केलेलें वर्णन यथार्थ आहे यांत शंकाच नाहीं. खुद्द महाभारतांतच व्यासांनीं तीर्थयात्रेचें एक पवित्र क्षेत्र म्हणून याचें वर्णन केलेलें आहे. वनपर्वांतील तीर्थयात्रापर्वांत ऋषींनीं युधिष्ठिराला सबंध भारतवर्षांतील तीर्थयात्रास्थानें वर्णन करून सांगितलीं आहेत. ( अध्याय ८० ते ९० ) त्या तीर्थयात्रास्थानांत गंगाद्वार, कनखल, गंगावतरण व बद्रीक्षेत्र यांचा उल्लेख आहे.

वनवासांत असलेले पाण्डव तीर्थयात्रा करीत करीत उत्तर दिशेला आले व त्यांनीं हिमालयांतील गंधमादन वनामध्यें प्रवेश केला. तेथून त्यांना बद्रीकेदारास जावयाचें होतें. त्याप्रमाणें ते गंधमादनांतील नरनारायण-आश्रमांत येऊन तेथें कांहीं दिवस सुखानें राहिले. ( वनपर्व, अध्याय १४३ ते १४५ ). ते तेथें असतांना एक विलक्षण घटना घडली. ती घटना वर्णन करीत असतांना व्यासांना रामायण आणि महाभारत या राष्ट्रीय आर्ष महाकाव्यांचा संगम हिमालयावर घडवून आणण्याची संधि सांपडली. नरनारायण आश्रमांत सुखानें रहात असतां द्रौपदीला एक दिव्य आणि अद्भुत कमळ वाऱ्यानें उडवून आणलेलें दिसलें. स्त्रियांना फुलांची नैसर्गिक आवड असते. द्रौपदीनें भीमाला प्रार्थना केली कीं, “ नाथ, या कमळासारखीं आणखी पुष्कळ कमळें तुम्हीं माझ्यासाठीं घेऊन या. ” द्रौपदीच्या विनंतीस अनुसरून भीम हिमालयावर संचार करीत असतां भीमाला एक वानर वाटेंत आपलें पुच्छ पसरून बसलेला आढळला. भीमाला हनुमान म्हणून रामायणांतला एक रामभक्त

वानर माहीत होता. परंतु तोच हा वानर आहे असें भीमास माहीत नसल्यानें भीम त्याला म्हणाला, " अरे वानरा, वाटेंत पसरलेलें तुझें पुच्छ जरा पलीकडे कर पाहूं. "

त्यावर हनुमान म्हणाला, " मला माझें पुच्छ उचलतां येत नाहीं, तूंच तें उचलून बाजूला केलेंस तर बरें. " नवनाग-सहस्रबळी भीम आपली सर्व शक्ति खर्च करून तें पुच्छ उचलूं लागला. परंतु तें त्याला जागचें हालेना. त्यामुळें त्याला आश्चर्य वाटून त्यानें हनुमंतास " तूं कोण आहेस ? " असा प्रश्न केला. त्याचें उत्तर म्हणून भगवान् श्रीरामचंद्राचें पवित्र चरित्र हनुमंतानें भीमाला सांगितलें. याप्रमाणें पवित्र हिमालय व पवित्र रामायण-महाभारत-कथा अशा तीन पवित्र वस्तूंचा संगम या ठिकाणीं घडला. नंतर भीमाच्या प्रश्नावरून ज्या ठिकाणीं सौगन्धिक कमळें फुलत होतीं त्या वनाचा मार्ग हनुमंतानें भीमास सांगितला. त्याप्रमाणें भीम पुढें गेल्यावर त्याला अपूर्व असें तें सौगन्धिक वन दिसलें. तेथें क्रोधवश नांवाचे कुबेराचे राक्षस रक्षक म्हणून बसलेले होते. त्यांनीं भीमास सांगितलें कीं, या वनांत कुबेराला विचारल्याशिवाय आपण प्रवेश करूं नये. पण भीमानें त्या राक्षसांची हरकत न जुमानतां आंत प्रवेश केला. राक्षसांनीं त्याला प्रतिबंध केला. तेव्हां आपल्या गदेनें त्यानें राक्षसांस ठार केलें व तेथील सरोवरांत प्रवेश करून तेथें स्नान, पान वगैरे आवरून भीमानें खूपशीं सौगन्धिक कमळें तोडलीं.

मध्यंतरीं जिवंत राहिलेले कांहीं राक्षस कुबेराकडे आले व भीमानें केलेल्या अत्याचाराची समग्र हकीगत त्यांनीं त्याला सांगितली. भीमाला जाऊन बराच वेळ झालेला आहे असें पाहून

धर्म द्रौपदीसह भीमाचा माग काढीत सौगंधिक सरोवरापर्यंत आला. कुबेरहि त्या ठिकाणीं आला. हें साहसकृत्य केल्याबद्दल धर्मानें भीमाचा निषेध केला, परंतु कुबेरानें त्या दोन बंधूंचा बहुमान करून त्या दोघांस कमळांसह नरनारायण-आश्रमाकडे परत पाठविलें. यानंतर पांडव हिमालय पर्वतांत बरेच दिसून राहून परत आले. बद्रीनारायण-प्रवेश व त्या क्षेत्राचें वर्णन करणारे कांहीं श्लोक पुढीलप्रमाणें आहेत.

आलोकयन्तस्तेजग्मुर्विशालां बदरींप्रति ।
(वनपर्व, १४५ : ११)

तसेंच या प्रदेशाचें पुढील वर्णन पहा —

ददृशुर्गिरिपादांश्च नानाधातुसमाचितान् ॥
विद्याधरसमाकीर्णान्युतान्वानरकिन्नरैः ।
तथा किं पुरुषैश्चैव गन्धर्वैश्च समन्ततः ॥
मयूरैश्चमरैश्चैव वानरै रुरुभिस्तथा ।
वराहैर्गवयैश्चैव महिषैश्च समावृतान् ॥
नदीजालसमाकीर्णान्नानापक्षियुतान्बहून् ।
नानाविधमृगैर्जुष्टान्वानरैश्चोपशोभितान् ॥
समदैश्चापि विहगैः पादपैरस्नितास्तथा ।
तेऽवतीर्य बहून्देशानुत्तरांश्च कुरूनपि ॥
ददृशुर्विविधाश्चर्यं कैलासं पर्वतोत्तमम् ।
तस्याभ्याशे तु ददृशुर्नरनारायणाश्रमम् ॥
(वनपर्व, १४५ : १२.१८)

अवेक्षमाणः कैलासं मैनाकं चैव पर्वतम् ।
गन्धमादनपादांश्च श्वेतं चापि शिलोच्चयम् ॥

उपर्युपरि शैलस्य बह्वीश्च सरितः शिवाः ।
पृष्ठं हिमवतः पुण्यं ययौ सप्तदशेऽहनि ॥

ददृशुः पाण्डवा राजन् गन्धमादनमन्तिकात् ।
पृष्ठे हिमवतः पुण्ये नानाद्रुमलतावृते ॥
( वनपर्व, १५८ : १७.१९ )

हिमालयावरील अरण्यांचें व्यासांनीं जें वर्णन केलेलें आहे आणि तेथील जे पशुपक्षी व विद्याधर किन्नरादि रहिवासी त्यांनीं सांगितले आहेत त्यांच्याच आधारावर कालिदास, बाणभट्ट, भारवि वगैरे महाकवींनीं आपापलीं हिमालयवर्णनें सजविलीं आहेत, असें स्पष्ट दिसतें.

अर्जुन व भीम हे दोघे दिग्विजय करीत असतां हिमालयावर येऊन त्यांनीं तो प्रदेश जिंकला, असें व्यासांनीं सभापर्वांत ( अ. २७.२८ व ३० ) सांगितलें आहे.

स विनिर्जित्य संग्रामे हिमवन्तं सनिष्कुटम् । (अ. २७.२९)

सरो मानसमासाद्य हाटकानभितः प्रभुः ।
गन्धर्वरक्षितं देशमजयत्पाण्डवस्ततः ॥ ( अ. २८.५ )

ततो हिमवतः पार्श्वं समभ्येत्य जलोद्भवम् ।
सर्वमल्पेन कालेन देशं चक्रे वशं बली ॥ ( अ. ३०.४ )

व्यासांनीं महाभारताच्या महाप्रस्थानिक व स्वर्गारोहण पर्वांत पांडवांचें महाप्रस्थान व स्वर्गारोहण हिमालयांतच झाल्याचें सांगितलें आहे. महापराक्रमी आणि धर्मज्ञ अशा पांडवांची अखेर हिमालयांतच झाली हें सांगण्यामध्यें हिमालय आणि पांडव या

दोघांचीहि भव्यता व्यासांनीं व्यक्त केलेली आहे. शंकरावरील भक्तीमुळें असो किंवा हिमालयाच्या पावित्र्यामुळें असो, आजहि आपण कोठेंहि मृत झालेला मनुष्य 'कैलासवासी' झाला असें म्हणतों. पांडवांप्रमाणें मेल्यानंतर कैलासांत रहावयास जावयाचें अशी आपली भावना आहे. पांडवांचें महाप्रस्थान महाभारतांत पुढील-प्रमाणें वर्णिलें आहे.

भगवान् श्रीकृष्ण दिवंगत झाल्यावर व यादवांचा आपापसांतील कलहामुळें नाश झाल्यानंतर धर्माला फार वाईट वाटलें व त्याच्या तोंडून उद्गार निघाला कीं, काल हा सर्वच प्राणिमात्रांची आहुति आपल्या उदरांत घेत असतो. ( कालः पचाति भूतानि सर्वाण्येव महामते। १७ : १–३ ). नंतर सर्व पांडव एकत्र जमले व त्यांनीं परीक्षिताला राज्याभिषेक केला. राज्याची सर्व निरवानिरव करून व प्रजाजनांचा निरोप घेऊन पांच पांडव, द्रौपदी आणि कुत्र्याचें रूप घेतलेला धर्म असे सातजण महाप्रस्थानाला निघाले. नंतर या पांडवांनीं सर्व दिशांना प्रवास केला व ते उत्तर दिशेकडे निघाले. उत्तर दिशा ही देवांची दिशा, त्यामुळें स्वर्गास जाऊं इच्छिणाऱ्यानें हातांत अग्नि घेऊन उत्तरेकडे जावें असें आपलें धर्मशास्त्र सांगतें. रामहि उत्तरेकडे तोंड करून व हातांत अग्नि घेऊन शरयू नदीपर्यंत आला असें रामायणांत वर्णन आहे.

पांडव उत्तर दिशेकडे प्रवास करीत असतां त्यांना हिमालय हा महापर्वत लागला. त्यांतून प्रवास केल्यानंतर त्यांना एक वालुकामय प्रदेश दिसला व त्याच्यापुढें पर्वतांत श्रेष्ठ असणारा मेरु पर्वत त्यांना लागला.

ततस्ते नियतात्मान उदीचीं दिशमास्थिताः।
ददृशुर्योगयुक्ताश्च हिमवन्तं महागिरिम् ॥
तं चाप्यतिक्रमन्तस्ते ददृशुर्वालुकार्णवम्।
अवैक्षन्त महाशैलं मेरुं शिखरिणां वरम् ॥
(१७ : २ : १.२)

यानंतर प्रवास करीत असतां पांडवांपैकीं एक एक मार्गावर मृत होऊन पडूं लागले. द्रौपदी, सहदेव, नकुल, अर्जुन व भीम या क्रमानें ते पडले. यानंतर धर्म स्वर्गाला पोहोंचला तो स्वर्ग म्हणजे त्रिविष्टप किंवा तिबेट असावा असें वाटतें.

स्वर्गं त्रिविष्टपं प्राप्य धर्मराजो युधिष्ठिरः॥
(१८ : १ : ४)

संजय सुद्धां धृतराष्ट्र-गांधारीच्या निधनानंतर हिमालयांत आला, असें वर्णन आहे. यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, जीवन आणि मरण या दोन्ही गोष्टींसाठीं भारतीयांना हिमालयाची विलक्षण ओढ आहे.

■ ■ ■

## कविकुलगुरु कालिदासाचें आकर्षण

कविकुलगुरु कालिदास याचें लक्ष एकसारखें हिमालयावरच केंद्रित झालेलें आहेत. हिमालयाचें इतकें आकर्षण असणारा त्याच्याशिवाय दुसरा संस्कृत कवि नाहीं. त्याच्या प्रसिद्ध सात कलाकृतींपैकीं पांचामध्यें त्यानें हिमालयाचें वर्णन केलेलें आहे. हिमालयाचा कांहीं ना कांहीं तरी संबंध आपल्या कथाभागांत आणावयाचाच असें त्याचें धोरण दिसतें. हिमालयाच्या उच्चारावांचून जणुं कांहीं त्याला चैनच पडत नाहीं. कुमारसंभव, मेघदूत, रघुवंश,

शाकुंतल आणि विक्रमोर्वशीय या पांच कलाकृतींत त्यानें कमी-अधिक प्रमाणांत हिमालयाचें कौतुक केलें आहे.

'कुमारसंभव' या त्याच्या पहिल्या महाकाव्यांत तर हिमालय ही एक चालतीबोलती सचेतन व्यक्तीच झालेली आहे. ती व्यक्ति स्थावर हिमालयाची अधिष्ठात्री देवता होय. याच अर्थानें त्यानें हिमालयाला 'देवतात्मा' म्हटलें आहे. मेनेशीं लग्न करणें आणि पार्वतीला जन्म देणें अशा तऱ्हेचा सचेतनांनाच शक्य असणारा व्यवहार त्याच्याकडून व्हावा म्हणून कालिदासानें या ठिकाणीं त्याला सचेतन स्वरूप दिलें आहे. " देवता म्हणजे देवतास्वरूप हा ज्याचा अधिष्ठाता आहे तो हिमालय " अशी सुप्रसिद्ध टीकाकार मल्लिनाथ यानें 'देवतात्मा' शब्दाची फोड केलेली आहे. कालिदासानें कुमार-संभवांत केलेल्या हिमालयवर्णनाचें मुख्य वैशिष्ट्य हें आहे कीं, तेथें त्यानें हिमालयाचें स्थावर आणि जंगम या दोन्ही रूपांत मनोहर दर्शन घडवून आणलें आहे. हिमालयाच्या स्थावर आणि जंगम रूपांत इतकी सुंदर सांधेजोड कालिदासानें केली आहे कीं, तीं एकमेकांपासून वेगळीं करतां येत नाहींत. ज्या हिमालयवर्णनाचा उद्घोष सबंध भारतभर चालतो तें वर्णन असणारा कालिदासाचा प्रसिद्ध श्लोक पुढीलप्रमाणें आहे :

**अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजः ।**
**पूर्वापरौ तोयनिधीवगाह्य स्थितः पृथिव्या इव मानदण्डः ॥**

भारतवर्षाची उत्तरदिशा म्हणजे देवभूमि. त्या देवभूमीमध्यें उत्तरदिशेला सर्व पर्वतांचा सम्राट् हिमालय नांवाचा पर्वत आहे. हा हिमालय सचेतन असून देवतारूप आहे. पूर्व समुद्र आणि

पश्चिम समुद्र या दोन समुद्रांच्या सीमांना तो भिडलेला असल्यामुळें जणु काय भारतरूप पृथ्वी मोजण्यासाठीं त्याचा मानदंड म्हणून ( लांबी रुंदी मोजण्याची काठी म्हणून ) उपयोग केला गेला आहे असें वाटतें. ब्रह्मांडपुराणांत हिमालयाचें असेंच वर्णन आहे. तेथें म्हटलें आहे, "कैलासो हिमवांश्चैव दाक्षिणे वर्षपर्वतौ। पूर्वपश्चिमगावेतावर्णवान्तरुपस्थितौ।" कैलास आणि हिमालय असे दोन वर्षपर्वत आहे. व ते पूर्व आणि पश्चिम अशा दोन समुद्रांमध्यें अधिष्ठित झालेले आहेत.

कालिदासानें यापुढें केलेल्या हिमालयाच्या वर्णनांत त्याचीं स्थावर जाणि जंगम रूपें एकमेकांत कशीं गुंफलेलीं आहेत तें पहाण्यासारखें आहे. विष्णुपुराणांत आणि भागवतपुराणांत असें सांगितलें आहे कीं, पूर्वीं एकदां पृथ्वीची धार काढण्यांत आली म्हणजे तिचें दोहन केलें गेलें. हें दोहन करणारे सर्व पर्वत असून धार काढण्यांत कुशल असा मेरु पर्वत त्यांमध्यें प्रमुख होता आणि हिमालयाला वत्स करण्यांत आलें होतें. पृथु राजानें तेथें मार्गदर्शन केलें आणि धरित्रीचें दोहन करून दूध कोणतें काढलें म्हणाल, तर कांतिमान रत्नें आणि महौषधि. पृथु राजानें घडवून आणलेल्या या पृथ्वीदोहनचा अर्थ असा आहे कीं, हिमालयांत पृथ्वींतील वस्तूंचें सार आहे. ज्याप्रमाणें धेनु वात्सल्यामुळें आपल्या वासराला आपल्या ठिकाणचें सारसर्वस्व देते तसें दोहनाच्या वेळीं वत्स झालेल्या हिमालयाला पृथ्वीनें आपल्यामधील सार दिलें.

हिमालयाच्या उंच शिखरावर तांबड्या कावेचे खडक आहेत. त्या तांबड्या खडकांचा रंग ढगावर पडतो व मावळत्या सूर्याचा हा

रक्तिमा आहे असा भ्रम तेथें रहाणाऱ्या अप्सरांना अकालींच होतो. सायंकाळच्या वेळीं नट्टापट्टा करून अप्सरांना इंद्रसभेंत नाचावयास जावयाचें असतें. पश्चिमेचे ढग तांबडे झालेले पाहिल्याबरोबर संध्याकाळचा भास त्यांना होतो व त्या लगबगीनें साजशृंगार करूं लागतात. हिमालय पर्वताचीं अत्यंत उंच शिखरें इतकीं गगनचुंबी आहेत कीं, जेमतेम त्याच्या मध्यभागापर्यंतच मेघ जाऊन पोहोंचतात. त्यामुळें तेथें रहाणारे सिद्ध खालीं पावसाचा त्रास होऊं लागला कीं, सूर्यकिरणांत तळपत असलेल्या त्या शिखरांच्या वरच्या भागाकडे जातात. हिमालयांत रहाणारे किरात सिंहांची शिकार करतात. त्याचेंहि एक वैशिष्ट्य आहे. तेथील सिंहांनीं हत्तींचीं गंडस्थळें फोडलेलीं असतात व त्यांत असणारीं मोत्यें हिमालयाच्या बर्फमय भूमीवर सांडलेलीं असतात. हत्तीच्या रक्तानें माखलेलीं सिंहाचीं पावलें त्या बर्फावर लागलेलीं असलीं तरी तें रक्त बर्फाच्या वितळण्यामुळें धुऊन गेलेलें असतें. असें असलें तरी केवळ गंडस्थळांतून खालीं पडलेल्या मोत्यांच्या खुणांनींच किरात सिंहांची पारध करूं शकतात.

हिमालयांत विद्याधरांच्या सुंदर स्त्रिया आपलीं प्रेमपत्रें भूर्जपत्रावर तेथील ओल्या कावेच्या रसानें लिहितात. तेथील गुहांमधून घोंघावणारा वारा वेळूच्या छिद्रांत शिरतो व त्यांतून मधुर ध्वनि निघूं लागतो. त्यावरून असें वाटतें कीं, हिमालय गाऊं इच्छिणाऱ्या किन्नरांची साथच करीत आहे. येथील सरल नांवाच्या झाडांना तेथील हत्ती आपलीं गंडस्थळें घाशीत असतात. त्यामुळें त्यांतून चीक निघतो व त्याचा गंध सर्वत्र दरवळून रहातो. रात्रीं प्रकाश

देणाऱ्या कांहीं वेली तेथें आहेत त्यामुळें या वेली म्हणजे रात्रभर प्रकाश देणाऱ्या बिनतेलाच्या दीपिकाच होत. या प्रकाशांत तेथें असणाऱ्या वनचरांचे विलास गुहांमधून चालतात.

हिमालयाच्या पठारावर चमरी नांवाच्या वनगायी आपलीं पांढरीं स्वच्छ पुच्छें वर करून सारखा संचार करीत असतात. चवरीसारखीं सतत ढाळलीं जाणारीं त्यांचीं तीं धवल पुच्छें पाहिलीं कीं, हिमालयाची पर्वताधिराज ही पदवी त्याच्यावर चवऱ्या ढाळून या वनगायी सार्थ करीत आहेत असें वाटतें. हिमालयावरून भागीरथीचा प्रवाह वाहत असतो. त्यामुळें त्यावरून वाहणारा वारा थंडगार झालेला असतो. त्या वाऱ्यामुळें देवदारु वृक्षांचीं बनें डोलत असतात. हिमालयांत हरणांच्या मागें लागून दमलेल्या किरातांचा श्रमपरिहार या वाऱ्यामुळें होतो. आंगिरस, वसिष्ठ, मरीचि, पुलस्त्य, पुलह इ. सप्त ऋषि हिमालयांतील शिखरांवर असलेल्या सरोवरांत फुललेलीं कमळें देवतार्चनासाठीं तोडून नेतात. हीं पर्वतशिखरें सूर्य-मंडलापेक्षांहि अधिक उंच असल्यामुळें तेथील कमलांचें विकसन करण्यासाठीं सूर्यकिरणांना ऊर्ध्वमुख होऊन वर जावें लागतें. ह्याचा अर्थ हिमालयाचीं अत्युच्च शिखरें सूर्यमंडलाहूनहि उंच आहेत असा आहे.

■ ■ ■

## पार्वती-परमेश्वराचें निवासस्थान

हिमालयामध्यें यज्ञाला लागणारी सोमलता इत्यादि सर्व साधनसामग्री आहे. तसेंच पृथ्वीला सावरून धरण्याचें सामर्थ्य

त्याच्यामध्यें आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून ब्रह्मदेवानें त्याला यज्ञामध्यें इंद्रादि देवांबरोबरच अंशभागी केलें व सर्व शैलांचें आधिपत्य त्याला बहाल केलें. ऋषिमुनींनाहि मान्य असणारी पितरांची मानसकन्या मेना इचा विवाह हिमालयाशीं झालेला होता. तिच्यापासून हिमालयाला मैनाक व पार्वती अशीं दोन अपत्यें झालीं. ही पार्वती म्हणजे दुसरी तिसरी कोणी नसून पूर्व-जन्मांतली दक्षकन्या सतीच होती. तिचा दक्षप्रजापतीनें अपमान केल्यामुळें तिनें योगाग्नीनें आपला देह जाळला व पुढील जन्मांत पार्वतीचें रूप घेऊन ती हिमालयाच्या पोटीं आली. जन्मतःच अत्यंत सुंदर असलेली पार्वती यौवनामुळें अधिकच लावण्यवती झाली. उपवर झालेल्या पार्वतीला योग्य वर पहाण्याच्या विचारांत हिमालय होता. तोंच एके दिवशीं नारद ऋषि त्याजकडे आले व त्याला म्हणाले, "हिमालया, तुला चिंता नको. तुझी ही कन्या पार्वती शंकराची पत्नी होणार आहे." हिमालयानेंहि मग पार्वतीकारितां निराळें वरसंशोधन करण्याचें थांबविलें. मात्र शंकरानें आपण होऊन कन्येला मागणी घातल्यावांचून हिमालय पार्वती त्याला देऊं शकत नव्हता; कारण त्या वेळच्या शिष्टांचा तो आचार होता. म्हणून हिमालय त्या संधीची वाट पहात स्वस्थ राहिला.

आपली पहिली पत्नी दक्षकन्या सती इनें देहत्याग केल्या-पासून शंकराला वैराग्य प्राप्त झालें होतें व तो सर्वसंगपरित्याग करून हिमालयाच्या एका शिखरावर तप करीत बसला होता. त्याच्याभोंवतीं त्याचे गण होते. त्या गणांनीं हिमालयांतील नमेरु

वृक्षांचे तुरे आपल्या डोक्यांत खोविले होते. भूर्ज वृक्षांच्या मऊ साली वल्कलें म्हणून परिधान केल्या होत्या. आणि तेथेंच मिळणाऱ्या मनशीळ नांवाच्या तांबड्या कावेचे पट्टे अंगावर ओढले होते. शिलाजतु म्हणजेच आज ज्याला शिलाजित म्हणतात त्यानें युक्त असलेल्या शिळातलावर ते शंकराचे गण बसलेले असत. सिंहांची गर्जना सहन न झाल्यामुळें प्रचंड डरकाळ्या फोडणारा नंदी खुरांनीं तेथील शिलाखंड फोडीत तेथें उभा असे. त्या त्याच्या डरकाळ्यांना भिऊन तेथील गवय ( गवे ) मोठ्या भीतीनें त्याच्याकडे पहात असत.

हिमालयानें स्वतः शंकराचा सत्कार केला व जया आणि विजया या दोन सख्यांबरोबर पार्वतीलाहि शंकराच्या सेवेस पाठविलें. पार्वती त्याची सेवा करीत असतां इंद्रानें मदनास तेथें पाठविलें. हेतु हा कीं, त्यानें शंकराचें मन जिंकून शिव-पार्वती विवाह घडवून आणावा. पण त्याचा परिणाम उलटाच होऊन आपल्या तपांत विघ्न आणणाऱ्या मदनाला शंकरानें जाळून टाकलें. त्या घटनेनें पार्वतीचा व हिमालयाचा मनोभंग झाला. हिमालयानें पार्वतीची कशी तरी समजूत घातली. जें सौंदर्यानें साधलें नाहीं तें तपानें साधावें म्हणून पार्वतीनें उग्र तपाचा निश्चय केला. पार्वतीनें हें उग्र तप करूं नये म्हणून तिची माता मेना तिचें मन वळवूं लागली. पण हिमालयास पार्वतीचा हा निश्चय योग्य वाटला व त्यानें तिला परवानगी दिली.

पार्वतीच्या तपानें व तिच्या भक्तीनें शंकर प्रसन्न झाले व त्यांनीं पार्वतीचा अंगिकार केला. पण पार्वतीनें शंकराला सुचविलें

कीं, “ आपण माझ्या वडिलांकडे माझ्यासाठीं मागणी घाला.” शंकरांनीं ती गोष्ट मान्य करून आपल्याकरितां हिमालयाकडे जाऊन मागणी घालण्याकरितां सप्तर्षि व अरुंधति यांना केवळ स्मरणानें बोलावून घेतलें व त्यांना सांगितलें कीं, “ केवळ देवांच्या हितासाठींच व तारकासुराच्या नाशासाठीं मी पार्वतीशीं विवाहबद्ध होऊं इच्छित आहें. तरी तुम्ही हिमालयाकडे जाऊन माझ्यासाठीं पार्वतीस मागणी घाला.” वसिष्ठ, मरीचि, आंगिरस, पुलस्त्य, पुलह इत्यादि सप्तर्षि अरुंधतीसह हिमालयाकडे आले. तेव्हां त्यांना तेथें हिमालयाची राजधानी दिसली.

हिमालयाच्या राजधानीचें नांव ‘ओषधिप्रस्थ’. दुसऱ्या कोणीहि वर्णन न केलेल्या या राजधानीचें वर्णन कालिदासानें पुढीलप्रमाणें केलें आहे : शुभ्र उदकानें खळाळणारा गंगेचा प्रवाह हाच त्या राजधानीचा नैसर्गिक खंदक. रत्नशीलांचे उंच खडक हे तिचे स्वाभाविक तट. या तटांत उगवलेल्या व रात्रीं आपोआप प्रकाशणाऱ्या वनस्पति ह्याच तेथल्या दीपिका. यक्ष, किन्नर आणि वनदेवता हे तिचे रहिवासी. अगोदरच गगनचुंबी गिरिशिखरांवर वसलेल्या या नगरींतले प्रासाद आणि महाल किती तरी उंच. त्यांच्या गच्च्यांवरील स्फटिकाच्या फरसबंदींत आकाशांतील नक्षत्रें प्रतिबिंबित झालेलीं असत. आणि तीं तेथेंच उधळलेल्या माणिक-मोत्यांच्या ओंजळीसारखीं चमकत असत. गडगडाट करणारे मेघ तेथील महालांच्या इतके जवळ असत कीं, नृत्यमंदिरांत मृदंग वाजत आहेत का मेघध्वनि होत आहेत याचा भ्रमच एखाद्यास पडावा. या नगरीच्या बाहेर ‘गंधमादन’ नांवाचें उद्यान आहे. तेथील संतानक

वृक्षाखालीं विद्याधर प्रवासी विसांवा घेत पडलेले असतात. येथील अभिसारिका वनस्पतीच्या प्रकाशांत रात्रीं संचार करीत. येथील रहिवाशांना यौवन ही एकच अवस्था असे.

अशा या वैभवशाली नगरींत रहाणाऱ्या हिमालयाकडे सप्तर्षि गेले. त्यांचा हिमालयानें यथोचित सत्कार केला व तो त्यांना म्हणाला, "आपल्या आगमनानें मला फार आनंद झाला आहे. माझ्या मस्तकावर गंगेचा पवित्र प्रवाह असतोच. पण आज आपल्या ह्या पादोदकानें मी अधिक पवित्र झालों आहें. स्थावर-जंगम अशीं माझीं दोन रूपें आहेत. त्यांपैकीं माझ्या स्थावर स्वरूपाला तुमचे पवित्र चरण लागलेच आहेत. पण माझ्या या जंगम स्वरूपाला ( म्हणजे देहधारी देवतास्वरूप मला ) कांहीं काम सांगून आपण मजवर अनुग्रह करावा. आपल्यासारख्या तेजस्वी व्यक्तींच्या दर्शनानें माझ्या दऱ्याखोऱ्यांतील अंधारच केवळ नाहींसा झाला आहे असें नव्हे, तर माझ्या मनांत असलेलें तमोरूप अज्ञानहि नाहींसें झालें आहे. तरी आपण मजकडे कोणत्या हेतूनें आलां आहांत तें सांगून मजवर अनुग्रह करा."

यानंतर ऋषींनीं हिमालयाची पुढीलप्रमाणें स्तुति केली. ऋषि म्हणाले, "हे हिमालया, तुला स्थावररूप विष्णुच मानतात तें अत्यंत योग्य आहे. तुझी कुक्षी चराचरांचा आधार आहे. अगदीं खालीं पाताळापासून तूं या पृथ्वीला सावरून धरलें आहेस म्हणूनच आपल्या कोमल फणांवर शेषाला पृथ्वी धारण करतां येते. तुझ्या धवल कीर्तीप्रमाणें तुझ्यांतून निघणाऱ्या पवित्र सरिता समुद्रापर्यंत जाऊन पोहोंचल्या आहेत व लोकांना पवित्र करीत

आहेत. गंगा ही विष्णूच्या पायापासून निघाली म्हणून ती गौरवास्पद झाली आहे. परंतु तिचा दुसरा जन्म तुझ्या शिखरापासून झाला, यामुळेंहि तिचा तितकाच गौरव आहे. विष्णूनें वामनावतार घेऊन आपण वरखालीं व चोहोंकडे पसरलेले आहों असें केवळ एकदांच दाखविलें; पण तूं सर्वत्र व्यापक स्वरूपांत नेहमींच असल्यानें तुझा हा महिमा स्वाभाविकच आहे. यज्ञाचा भाग घेणाऱ्या इंद्रादि देवांमध्येंहि तुझी गणना आहे. त्यामुळें सोन्याचीं शिखरें असणाऱ्या मेरु पर्वताचाहि तूं नक्षा उतरविला आहेस. तुझ्या ठिकाणीं असणारा कठिणपणा हा तुझ्या स्थावर शरीराच्या ठायीं आहे. परंतु तुझें हें जंगम रूप मात्र भक्तीमुळें अत्यंत मृदु आणि नम्र झालेलें असून तें सज्जनांच्या आराधनेला सज्ज आहे. तरी आम्ही तें कार्य योजून तुजकडे आलों आहों. तें कार्य सिद्धीस ने.

"तुझी कन्या पार्वती शंकराला दे. उमेसारखी वधू, तुझ्यासारखा कन्यादान करणारा, शंकरासारखा वर व त्याच्याकरितां मागणी घालावयास आलेले आमच्यासारखे ऋषि हा योगच इतका अपूर्व आहे कीं, आपण योजलेला हा विवाह तुझ्या कुलाची चिरंतन कीर्ति वाढवावयास कारणीभूत होईल." हिमालयाला ही गोष्ट मान्यच होती. परंतु त्यानें आपली पत्नी मेना हिच्या मुखाकडे तिची संमति घेण्यासाठीं पाहिलें. बरोबरच आहे; मुलीच्या लग्नाबाबत तिच्या आईची दृष्टि हीच खरी दृष्टि. अर्थात् मेना तरी कशाला नको म्हणणार आहे ? लग्न ठरलें. हिमालय पर्वतावर अपूर्व असा लग्नसोहळा झाला. शंकराच्या क्रोधानें जळून गेलेला मदन पुन्हा जिवंत झाला. विवाहाच्या ह्या अपूर्व

सोहळ्यासाठीं ब्रह्मा, विष्णु, इंद्र, चंद्र इत्यादि सर्व देवदेवता आल्या. विवाहानंतर शंकरानें पार्वतीच्या सहवासांत विविध विलास भोगले आणि त्यामुळें हिमालयाचे गंधमादनादि सर्व प्रदेश कृतार्थ झाले.

हिमालयाच्या जंगम रूपाचें इतकें उत्कृष्ट वर्णन कालिदासाव्यतिरिक्त दुसऱ्या एकाहि कवीनें केलेलें नाहीं. कालिदासाची हिमालयावर इतकी असीम भक्ति आहे कीं, हिमालयाचें जड पार्थिव रूप वितळून जाऊन कालिदासाच्या मनांत त्याची एक मनोहर मूर्ति निर्माण झाली होती. अत्यंत समृद्ध, संस्कृतिसंपन्न, उदार, संयमी, कन्यावत्सल, असा ऐश्वर्यसंपन्न सम्राट् कालिदासाच्या समोर हिमालयाच्या रूपानें उभा राहिला होता. भारतांतील भौतिक व आध्यात्मिक संस्कृतीचा साज त्यानें हिमालयावर चढविला आहे. हिमालय ही जशी एक पवित्र तपोभूमिका आहे तशी ती एक रम्य विलासभूमीहि आहे; हिमालय हा जसा वैराग्याला व संसारत्यागाला अनुकूल आहे तसाच तो सात्त्विक आसक्तीला व गृहस्थाश्रमालाहि पोषक आहे असें कालिदासानें 'कुमारसंभवां'त दाखविलें आहे.

कालिदासानें 'रघुवंशा'च्या दुसऱ्या सर्गांत हिमालयाच्या परिसरांतील आश्रमीय जीवनाचें एक रम्य चित्र रेखाटलें आहे. तेथें घडलेला एक अद्‌भुत चमत्कारहि त्यानें आपल्या लालित्यपूर्ण वाणीनें निवेदिला आहे. राजा दिलीप हा भगवान् श्रीरामचंद्राचा पूर्वज. त्याला संतति नव्हती. म्हणून आपली पत्नी सुदक्षिणा इच्यासह संततिप्राप्तीचा इलाज करण्यासाठीं तो वसिष्ठाश्रमांत आला. वसिष्ठ हे दिलीपाचे कुलगुरु. या वसिष्ठ ऋषींचा आश्रम

कालिदासानें एका रमणीय अशा हिमालयांतील परिसरावर कल्पिलेला आहे. राजा ज्या वेळीं आश्रमांत आला त्या वेळीं संध्याकाळ झाली होती. समिधा, दर्भ व कंदमुळें घेऊन वसिष्ठाचे शिष्य अरण्यांतून आश्रमाकडे परतत होते. आश्रमांतील पाडसें ऋषिपत्न्यांच्या हातून नीवार धान्य मिळविण्यासाठीं पर्णकुटीचीं द्वारें अडवून उभीं होतीं. वृक्षांच्या अव्यांतील पाणी पिण्यास पक्ष्यांना भीति वाटूं नये म्हणून तेथील ऋषिकन्या पाणी ओतून पक्ष्यांची गंमत पहाण्यासाठीं वृक्षापासून दूर झाल्या होत्या. ऊन टळून गेल्यामुळें अंगणांत वाळवण्यासाठीं घातलेल्या नीवार धान्याच्या आतां राशी करून ठेवल्या होत्या. आश्रमाच्या अंगणांत बसून हरिणें रवंथ करीत होतीं. सायंयज्ञासाठीं अग्नि प्रज्वलित केला होता व यज्ञांत टाकलेल्या आहुतींच्या गंधानें वारा सुवासित झाला होता व तो आश्रमाकडे येणाऱ्या अतिथींना पावन करीत होता.

वसिष्ठ व अरुंधति या उभयतांना भेटून दिलीपानें आपल्याला संतान नाहीं ही गोष्ट वसिष्ठास निवेदन केली. वसिष्ठांनीं अंतर्ज्ञानानें राजाला संतति न होण्याचें कारण शोधून काढलें. दिलीपानें पूर्वी एकदां सुरभि कामधेनूचा अपमान केला होता. त्यामुळें रागावून तिनें दिलीपाला असा शाप दिला कीं, “ माझ्या संततीची सेवा केल्याशिवाय तुला संतति होणार नाहीं. ” सुदैवानें कामधेनूची संतति नंदिनी वसिष्ठांच्या आश्रमांतच होती. त्या नंदिनीची सेवा करावयास वसिष्ठांनीं दिलीपास सांगितलें. त्याप्रमाणें दिलीपानें एकवीस दिवसपर्यंत नंदिनीची उत्तम प्रकारें सेवा केली. तो तिला हिमालयांतील रमणीय प्रदेशांत चरण्यासाठीं दररोज घेऊन जात असे.

बाविसाव्या दिवशीं नंदिनीच्या मनांत काय आलें कोणास ठाऊक ? त्या दिवशीं हिमालयाच्या एका नवीनच प्रदेशांत ती त्याला घेऊन गेली व हिमालयाच्या एका गुहेंत शिरली. तेथें गंगेच्या पाण्याचा धबधबा झालेला असून कोंवळें गवत वाढलेलें होतें.

**अन्येद्युरात्मानुचरस्य भावं जिज्ञासमाना मुनिहोमधेनुः।**
**गङ्गाप्रपातान्तविरूढशष्पं गौरीगुरोर्गह्वरमाविवेश ॥**

(रघु : २.२६)

हिमालयांतील हिंस्र पशु मनानें सुद्धां या गायीला इजा करूं शकणार नाहींत, या विश्वासानें गायीबरोबर असणारा दिलीप हिमालयाची रमणीय शोभा पहाण्यांत गुंतला. इतक्यांत एक सिंह उडी मारून गायीच्या मस्तकावर बसला. हा सिंह भगवान् शंकराचा एक गण होता व त्याला उपास पडल्यामुळें त्याला ती गाय खावयाची होती. दिलीप आणि तो सिंह यांचें संभाषण झालें व दिलीपानें गायीसाठीं आपला देह सिंहाला अर्पण केला. " तूं या गायीला सोड व मला खा " असें म्हणून दिलीप सिंहाच्या पुढें पडतो न पडतो तोंच विद्याधरांनीं दिलीपाच्या अंगावर पुष्पवृष्टि केली. दिलीप डोळे उघडून पहातो तों त्याला तो सिंह दिसला नाहीं. या अद्भुत चमत्काराचें आश्चर्य करणाऱ्या दिलीपाला नंदिनी म्हणाली, " तुझी सत्त्वपरीक्षा पहाण्यासाठीं मीच ही माया उत्पन्न केली होती. तुझ्या त्यागानें मी प्रसन्न झालें आहें. माझें दूध काढून पी, म्हणजे तुला हवा असलेला पुत्र मिळेल. त्याप्रमाणें दिलीप व सुदक्षिणा यांना कांहीं काळानें अत्यंत पराक्रमी आणि वंशाची कीर्ति वाढविणारा रघु नांवाचा एक सुपुत्र झाला.

नंदिनी-वरप्रदानाचा हा अत्यंत अद्भुत प्रसंग हिमालयाच्या भव्य पार्श्वभूमीवर वर्णिला असल्यानें त्याला आगळें आकर्षकत्व लाभलें आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६२४० वि: निबंध
९८८५ ०१।११६५

## युद्धभूमि नि विलासभूमि

'रघुवंशा'च्या चौथ्या सर्गांत कालिदास हिमालयांतील एका निराळ्याच प्रसंगाचें वर्णन करतो. दिलीपाचा पुत्र रघुराजा दिग्विजय करीत करीत हिमालयाच्या प्रदेशांत येतो व तेथील रहिवाशांचा पराभव करतो. याचें मोठें वेधक वर्णन कालिदासानें केलें आहे. कंबोज देशांतील राजांचा पराभव केल्यानंतर रघु हिमालयांत आला व हिमालय पर्वतावर चढला. त्या वेळीं रघू-बरोबर मोठें अश्वसैन्य होतें. त्या अश्वांनीं आपल्या टापांनीं उडव-लेली धूळ हिमालयाच्या शिखरावरून उंच उडत होती. ती पाहिली असतां असें वाटे कीं, या धुळीच्या मिषानें रघुराजा हिमालयाच्या शिखरांची उंचीच वाढवीत आहे.

**ततो गौरीगुरुं शैलमारुरोहाश्वसाधनः ।**
**वर्धयन्निव तत्कूटानुद्धूतैर्धातुरेणुभिः ॥**

( रघु. ४ : ७१ )

या वेळीं हिमालयाच्या गुहांतून सिंह झोंपलेले होते. सैन्याचा कलकलाट ऐकून ते जागे झाले, पण न बुजतां व न भितां त्यांनीं नुसतें सैन्याकडे मान वळवून पाहिलें मात्र. आपल्या सैन्याप्रमाणेंच पराक्रमी असलेल्या या सिंहांचें रघुराजानें कौतुक

केलें. हिमालयांतील नमेरु वृक्षांच्या छायेंत रघूच्या सैनिकांनीं विश्रांति घेतली. सैन्यांतील हत्ती हिमालयांतील देवदारु वृक्षांना बांधलेले होते. रघूचें हें सैन्य आलेलें पहातांच किरात व इतर डोंगरी रहिवासी हे रघूशीं सामना देण्यास पुढें सरसावले. त्यांचा रघूनें पराभव केला व उत्सवसंकेत नांवाच्या तेथील रहिवाशांचाहि संपूर्ण पराभव करून तेथील किन्नरांना आपलें यशोगान करावयास लाविलें. पराभूत झालेल्या हिमालयांतील लोकांनीं रघुराजाला निरनिराळ्या प्रकारचे नजराणे आणून दिले. त्या वेळीं हिमालयाचें द्रव्यरूप सामर्थ्य रघुराजाच्या ध्यानीं आलें व रघुराजाचें बाहुसामर्थ्य हिमालयाच्याहि ध्यानीं आल्यावांचून राहिलें नाहीं.

**परस्परेण विज्ञातस्तेषूपायनपाणिषु।**
**राज्ञा हिमवतः सारो राज्ञः सारो हिमाद्रिणा॥**

(रघु. ४ : ७९)

याप्रमाणें रघुराजानें आपलें अजिंक्य यश हिमालय पर्वतावर स्थापिलें आणि त्या हिमालयाला त्यानें थोडीशी लाज आणली. कारण पूर्वीं एकदां रावणानें आपल्या दहा भुजांनीं कैलास शिखर गदगदां हालवून सोडलें होतें. याप्रमाणें हिमालयावर विजय संपादन करून रघूनें लोहित्या नांवाची नदी ओलांडली व तो आसाममध्यें प्राग्ज्योतिष राजाच्या प्रदेशांत आला.

या वर्णनांत कालिदासानें हिमालय ही युद्धभूमीहि झाल्याचें दाखविलें आहे.

'मेघदूता'मध्यें हिमालयवर्णनाची एक वेगळीच तऱ्हा आहे. कुबेराच्या शापानें आपल्या प्रियेपासून दूर झालेला एक विरही

यक्ष रामगिरी पर्वतावरील एका आश्रमांत रहात होता. पावसाळ्याच्या आरंभीं एक मेघ आकाशांत त्याला तेथें दिसल्यावर त्यानें त्या मेघासच आपला दूत कल्पिलें व रामगिरी ते कैलास पर्वत यांमधला मार्ग मेघास सांगून हिमालयावरील अलका नगरींत असलेल्या आपल्या पत्नीकडे नेण्यासाठीं एक निरोपहि त्याला दिला.

मधल्या प्रदेशांचें वर्णन केल्यानंतर यक्ष हिमालय प्रदेशाचें वर्णन करीत आहे. यक्ष मेघाला म्हणतो : मेघा, गंगाद्वाराजवळील कनखल तीर्थास तूं गेल्यानंतर मग हिमालयावर येऊन पोहोंचशील. हिमालयाच्या शिखरावरील शिळा तेथें विसांवलेल्या कस्तुरी मृगांमुळें सुगंधित झालेल्या असतील. या सुगंधी आणि रमणीय शिखरावर तूं विसांव्यासाठीं बैस. पर्वत-शिखरें पांढरीं स्वच्छ व त्यावर तूं निळ्या रंगाचा मेघ बसलेला. त्यामुळें तूं शंकराच्या शुभ्र नंदीनें आपल्या शिंगांनीं उकरलेल्या चिखलासारखा दिसशील.

त्या वेळीं हिमालयाच्या पठारावर वणवा लागलेला असेल. देवदारूच्या फांद्या एकमेकींना घासल्यामुळें अग्नि निर्माण होतो व वणवे लागतात. त्या वणव्यांत तेथील चमरी नांवाच्या वनगायी सांपडून त्यांचे झुपकेदार केस जळतात. म्हणून हे मेघा, तूं तुझ्यामधील जलाची वृष्टि कर व तेथील वणवे विझवून टाक. हिमालयामध्यें शरभ नांवाचे प्राणी आहेत. त्यांना आठ पाय असतात. ते कदाचित् तुजवर हल्ला करतील. म्हणून त्यांच्यावर गारांची वृष्टि करून तूं त्यांची दाणादाण करून सोड. हिमालयांतील कांहीं शिळांवर शंकराचीं पावलें उमटलेलीं असतात व त्यांची पूजाअर्चा तेथील सिद्ध करीत असतात. ती शोभा तूं पहा. हिमालयांतील

किन्नरी शंकरानें केलेल्या त्रिपुरविजयाचें गायन करीत असतात. त्या गायनाला हे मेघा, तूंहि आपल्या गर्जनेनें साथ कर.

हिमालयाच्या तटप्रदेशाजवळील तीं प्रेक्षणीय स्थळें पाहून झाल्यावर तुला मानस सरोवराकडे जावयाचें प्रवेशद्वार लागेल. क्रौंच पर्वताला पडलेल्या भगदाडालाच क्रौंचरंध्र असें म्हणतात. शंकराचा पुत्र स्कंद या ठिकाणीं शंकराकडून धनुर्विद्या शिकला. परशुरामहि शंकराकडे धनुर्वेद शिकण्यासाठीं येथेंच आला होता. स्कंदाशीं स्पर्धा करून त्यालाहि मागें टाकण्याच्या ईर्षेनें परशुरामानें आपल्या तीक्ष्ण बाणांनीं क्रौंच पर्वतांत ही खिंड पाडलेली आहे व ही खिंड परशुरामाच्या सामर्थ्याची गाथा गात येथें उभी आहे. यानंतर तुला कैलास पर्वत दिसेल. या कैलास पर्वताला रावणानें आपल्या दाही भुजांनीं गदगदां हालविलें होतें. या कैलास पर्वतांत मेघा, तुला एक कुतूहलपूर्ण देखावा दिसेल. कैलास हा शंकर-पार्वतीचा क्रीडापर्वत आहे. या ठिकाणीं शंकर पार्वतीसह संचार करीत असतील. पर्वताची एखादी अवघड चढण चढण्यासाठीं शंकरानें आपल्या हाताचा आधार पार्वतीला दिला असेल. पार्वती कष्टानेंच ती चढण चढत असेल. अशा वेळीं मेघा, तूं आपल्यामधील पाणी गोठव आणि तिला वर चढण्यासाठीं स्वत:चा एक पायऱ्यांचा जिनाच तयार कर.

या ठिकाणीं तुला मानस सरोवर लागेल. या मानस-सरोवरांतून सोनकमळांचा जन्म होतो. कैलासाच्या उतरणीवर अलका ( नगरी ) वसलेली आहे. तिच्याजवळून गंगेचा शुभ्र प्रवाह वाहत असतो. त्यामुळें असें वाटतें कीं, अंगावरून ढळलेलें

पांढरें रेशमी वस्त्र सांवरीत एखाद्या लाडक्या स्त्रीप्रमाणें ही अलका कैलासाच्या मांडीवर बसली आहे.

यानंतर कालिदासानें केलेलें अलकेचें वर्णन हिमालयाच्या वैभवाचें द्योतक आहे. यक्ष मेघाला तें असें वर्णन करून सांगत आहे :

मेघा, तूं अलकेमध्यें प्रवेश केल्यावर तिच्यामधील वाडे तुला दिसूं लागतील. तूं आणि ते वाडे यांच्यामध्यें सारखेपणा आहे. त्यामुळें प्रत्येक बाबतींत ते तुझी बरोबरी करण्याजोगे आहेत. कसें ते पहा : तुझ्यामध्यें वीज आहे, तर त्या वाड्यांत बिजलीसारख्या सुंदर स्त्रिया रहातात. तुझ्यावर इंद्रधनुष्याची प्रभा पडते, तर त्या वाड्यांत सुंदर सप्तरंगी चित्रें रंगविलेलीं आहेत. तूं मधुर आणि गंभीर आवाज करतोस, तर त्या वाड्यांत चाललेल्या संगीतामध्यें सर्वदा मृदंगाचा आवाज ऐकूं येतो. तूं जलानें पूर्ण आहेस, तर त्या वाड्यांत रत्नखचित जमिनी आहेत आणि तूं जसा गगनांत उंच असतोस, तसे ते वाडेहि गगनचुंबी आहेत.

अलकेंत सहाच्या सहा ऋतु सर्वदा सुरू असतात. त्यामुळें या नगरींत रहाणाऱ्या तरुण स्त्रिया सर्व ऋतूंत उत्पन्न होणाऱ्या फुलांचे अलंकार एकदमच आपल्या अंगावर घालींत असतात. त्या शरद् ऋतूंत उत्पन्न होणारीं कमळें विलासाकरितां आपल्या हातांत धरीत असतात. हेमंत ऋतूंत उत्पन्न होणारीं कुंदाचीं फुलें केसामध्यें गुंफतात. शिशिर ऋतूंत उत्पन्न होणाऱ्या लोध्र पुष्पाच्या परागानें त्या आपल्या मुखावरील गौरवर्ण खुलवितात. वसंत ऋतूंत उत्पन्न होणारीं कुरबक पुष्पें आपल्या केशपाशांत त्या खोवतात. ग्रीष्म ऋतूंत उत्पन्न होणारें सुंदर शिरीषकुसुम त्या आपल्या कानांवर

ठेवतात आणि तुझ्या आगमनानें सूचित होणाऱ्या वर्षाकालांत उत्पन्न होणारीं कदंब पुष्पें त्या आपल्या भांगांत गुंफतात.

अलकानगरींत अमुक एक गोष्ट ठराविक मोसमांतच मिळते असें नाहीं. तेथें सर्व गोष्टी सर्वकाळ मिळतात. अलका-नगरींत वृक्ष नेहमीं फुललेले असतात. त्यामुळें ते उन्मत्त भ्रमरांच्या गुंजारवानें निनादून गेलेले असतात. कमळांच्या वेली कमळांनीं नित्य खचलेल्या असतात आणि कमळांमध्यें हंसाच्या रांगा असल्यानें त्या वेली हंसांच्या कमरपट्ट्यांनीं वेढल्यासारख्या दिसतात. घरांतल्या पाळीव मोरांना सदैवच लखलखते पिसारे असतात. ते केकारव करीत असतां आपल्या माना उंचावीत असतात. तेथील रात्री चांदण्यानें सतत धवळून निघालेल्या असल्याकारणानें तेथें अंधकाराचें नांवहि नसतें आणि त्या नेहमीं प्रकाशमान म्हणून रमणीय दिसतात.

अलकानगरींत वसति करून रहाणाऱ्या यक्ष नागरिकांच्या डोळ्यांत जर कधीं अश्रु उभे राहिलेच तर ते आनंदाचे असतात; दु:खाचे किंवा इतर कारणांनीं निर्माण झालेले नव्हेत. प्रेमकलहा-शिवाय अन्य कारणानें तेथील प्रेमिकांचा विरह होण्याची शक्यता नाहीं आणि तेथील रहिवाशांना तारुण्याशिवाय वयाची दुसरी अवस्था अनुभवावी लागत नाहीं.

येथील उंच वाड्यांच्या गच्च्या स्फटिकमण्यांनीं खचलेल्या असतात. त्यामुळें आकाशांतील तारकांचीं प्रतिबिंबें त्यांमध्यें पडतात. तीं पाहून असें वाटतें कीं, येथें कोणी तरी फुलेंच

उधळलीं आहेत. तेथील तरुण नागरिक आपल्या सुंदर स्त्रियांना बरोबर घेऊन त्या वाड्यांच्या गच्च्यांवर येतात. त्या वेळीं तेथें पुष्कर नांवाचीं वाद्यें वाजविलीं जात असतात. त्यांचा आवाज तुझ्या गंभीर ध्वनीसारखा भासतो.

अलकानगरीच्या जवळून वाहणाऱ्या मंदाकिनी नदीच्या तीरावर यक्षकन्यकांचा एक मजेदार खेळ चाललेला असतो. या खेळाचें नांव 'गुप्तमणि'. वाळूमध्यें लपविलेल्या रत्न वगैरे वस्तु शोधून काढण्याच्या स्वरूपाचा हा खेळ आहे. मुठींत रत्न वगैरे घेऊन तें वाळूंत दडवून ठेवावयाचें आणि दुसऱ्या मुलींना ते हुडकावयास लावावयाचें. या यक्ष-कन्यका इतक्या सुंदर आहेत कीं, देवांना देखील त्यांचा मोह पडावा. मुली या खेळांत मनसोक्त गुंतलेल्या असतांना मंदाकिनीच्या पाण्यावरून वाहणाऱ्या थंड झुळका त्यांना सुख देत असतात आणि तीरावर वाढणारे मंदार वृक्ष आपल्या सांवलीनें त्यांच्यावर पडणाऱ्या उन्हाचें निवारण करीत असतात. अलकानगरींतील विलासी यक्षांच्या मंदिरांतून रत्नांचे दीप आहेत. म्हणजे रत्नेंच आपल्या उज्ज्वल प्रकाशानें दिव्याचें काम करतात; तेलवातीच्या दीपांची आवश्यकताच तेथें नसते.

अलकेमध्यें पावसाळ्याच्या आरंभीं जोराचा वारा वाहत असतो. त्या वाऱ्यानें नुकतेच येऊं लागलेले पावसाळी मेघ तेथें असतात. सातमजली इमारतींत भिंतीवर काढलेलीं अत्यंत सुंदर चित्रें या मेघांच्या जलतुषारांनीं खराब होतात. आपल्याकडून चित्रें खराब करण्याचा अपराध झाला, घरमालक कदाचित् आपल्याला शिक्षा करतील अशी जणुं कांहीं भीति वाटून ते मेघ अत्यन्त

विरळ होतात आणि गवाक्षावाटे बाहेर निसटून जातात. कारण मेघ हे धुराच्या लोटांत आकार घेण्यांत मोठे निपुण असतात.

त्या अलकानगरींत मध्यरात्रीच्या वेळीं चंद्रावरलें तुझें आवरण दूर झालें म्हणजे चंद्रकिरण स्वच्छपणें प्रकाशूं लागतात. तेथील हवेल्यांच्या छतांत दोऱ्यांच्या जाळ्यांमधून टांगलेले चंद्र-कान्त मणी असतात. चंद्रकान्त मण्यांचा चंद्रकिरणांशीं संबंध आला म्हणजे ते आपल्यांतून पाण्याचे टपोरे थेंब गाळूं लागतात.

अलकानगरींतील प्रणयी युवकांच्या घरांत कधींहि नाश न पावणारे द्रव्याचे निधि असतात, असे ऐश्वर्यसंपन्न यक्षयुवक 'चैत्ररथ' नांवाच्या अलकानगरीच्या बाहेरच्या उद्यानांत विहार करीत असतात. ते देवांगनांच्या बरोबर गुजगोष्टी करण्यांत दंग झालेले असतात. तसेंच त्याच्या सांगाती किन्नरहि असतात. हे किन्नर, दररोज आपल्या गोड गळ्यांनीं उंच स्वरांत कुबेराच्या यशाचे पवाडे गात असतात.

त्या अलकानगरींत कुबेराचा मित्र शंकर साक्षात् रहात आहे हें मदन जाणतो. शंकराच्या क्रोधाला आपण एकदां बळी पडलेले आहों याची त्याला जरब वाटते. म्हणून भ्रमरांची दोरी असलेलें आपलें पुष्पांचें धनुष्य तो येथें फार करून धारण करीत नाहीं.

अलकानगरीमध्यें केवळ विलासी आणि कामी लोक रहा-तात आणि ते अत्यंत दुबळे आणि भित्रे आहेत असें मात्र मानण्याचें कारण नाहीं. तेथें युद्धवीराहि रहातात. येथील पानांच्या हिरव्या रंगासारखे हिरव्या रंगाचे घोडे सूर्याच्या हिरव्या रंगाच्या घोड्याशीं

स्पर्धा करतात. सूर्याच्या घोड्याप्रमाणेंच ते अत्यंत वेगवान् आणि चपल आहेत. तेथील हत्ती पर्वतासारखे धिप्पाड आहेत आणि तुझ्यांतून ज्याप्रमाणें जलवृष्टि होते तसा त्यांच्या गंडस्थळांतून मदाचा सारखा स्राव होत असतो. तेथील योद्धे इतक्या उत्कृष्ट प्रतीचे आहेत कीं, युद्धांत त्यांनीं रावणाशींहि टक्कर दिली आहे. रावणाशीं समरांगणावर समोरासमोर सामना दिलेला आहे. रावणाची 'चंद्रहास' नांवाची एक धारदार तरवार आहे. त्या तरवारीच्या अंगावर जे वण राहिलेले आहेत त्यांचा त्यांना अंगावरील दागिन्यांपेक्षांहि अधिक अभिमान वाटतो.

अलकानगरींतील एकटा कल्पवृक्ष हा स्त्रियांचीं सारीं सौंदर्य-प्रसाधनसाधनें पुरवितो. वेशभूषा करण्याच्या साधनांचे चार प्रकार आहेत. कांहीं केसांत गुंफावयाचीं, कांहीं देहावर धारण करावयाचीं, कांहीं पांघरावयाचीं आणि कांहीं विलेपन करावयाचीं. हीं चार प्रकारचीं वेषभूषा करण्याचीं साधनें एकटा कल्पवृक्षच निर्माण करतो. कसें तें पहा. बहुरंगी वस्त्रें, डोळ्यांना विलासाचे धडे देण्यांत पटाईत असलेलें मद्य, ( मद्य हें देखील विभूषणच; कारण त्यामुळें त्यांच्या डोळ्यांना देखील सौंदर्य येई. ) कोंवळी पालवी आणि फुलांचा बहर ( केसांत गुंफावयाचीं ); हरतऱ्हेचे दागिने ( देहावर घाला-वयाचे ) आणि पायांना लावावयास योग्य असा आळित्यांचा रंग ( विलेपन ).

कालिदासानें 'शाकुंतल' व 'विक्रमोर्वशीय' या दोनाहि नाटकांतील कांहीं महत्त्वाचे प्रसंग हिमालय प्रदेशावरच कल्पिलेले आहेत. त्यावरून त्याचें हिमालयावरील गाढ प्रेम व्यक्त होतें.

शकुंतलेचा पिता कण्व किंवा काश्यप याचा आश्रम हें 'शाकुंतलां'-तील महत्त्वाच्या घटनांचें स्थान आहे. हा आश्रम मालिनी नदीच्या तीरावर असून तो हिमालयाच्या पायथ्याजवळील प्रदेशावर वसलेला आहे, असें कालिदासानें आपल्या एका पात्राच्या द्वारें वदविलेलें आहे. व्यासाच्या भारतांतील शकुंतलोपाख्यानांत मालिनी नदीचा उल्लेख आहे, परंतु हिमालयाचा तसा उल्लेख नाहीं. तरीहि कालिदासाची कल्पना नेहमीं हिमालयाच्या पावित्र्यामुळें व भव्यतेमुळें आकृष्ट झालेली असल्यानें त्यानें हा आश्रम हिमालयाच्या पायथ्याशीं आहे असेंच स्पष्ट सांगितलें आहे.

गरोदर शकुंतलेला बरोबर घेऊन कण्वाचे शिष्य हस्तिनापुरांतील दुष्यन्ताच्या राजवाड्यांत आले असतां ती त्यांच्या आगमनाची वार्ता राजाचा कंचुकी पुढील शब्दांत सांगतो. "एते खलु हिमवतो गिरेरुपत्यकारण्यवासिनः काश्यपसन्देशमादाय सस्त्रीकास्तपस्विनः संप्राप्ताः। श्रुत्वा देवः प्रमाणम्।" म्हणजे 'हिमालयाच्या पायथ्याजवळील अरण्यांत रहाणारे हे तपस्वी काश्यपाचा म्हणजे कण्वाचा संदेश घेऊन एका स्त्रीसह आलेले आहेत. महाराजांची आज्ञा होईल तशी व्यवस्था करतों.' कण्वाचा आश्रम हिमालयाच्या पायथ्याशीं मानला म्हणजे पुढील महत्त्वाचे प्रसंग तेथेंच घडले असें ओघानेंच येतें. दुष्यन्त-शकुंतलेची भेट होऊन दोघांमध्यें तेथेंच प्रेम अंकुरित झालें, तेथेंच त्यांचा गांधर्वविवाह झाला आणि तेथेंच शकुंतलेला दुर्वासाचा शाप झाला. त्याचप्रमाणें शकुंतलेच्या पाठवणीचा वात्सल्य आणि कारुण्य या दोन रसांनीं ओथंबलेला प्रसंग याच ठिकाणीं घडला.

९३०८



'शाकुंतला'च्या सातव्या अंकाच्या शेवटीं मारीच ऋषींचा आश्रम आहे. तो हेमकूटवर आहे. हेमकूट हा पर्वत हिमालय प्रदेशांत समाविष्ट होणारा भाग आहे असें बाणानें मानिलें आहे. या हेमकूट पर्वतांतून सोन्याचा रस बाहेर निघतो ( कनकरस-निष्यन्दी ) असें कालिदासानें म्हटलें आहे. हा किंपुरुष-पर्वत तपस्व्यांचें सिद्धिक्षेत्र आहे व सुरासुरांचा गुरु मारीच आपली पत्नी जी अदिती तिच्यासह तेथें रहात आहे. हेमकूटावरील मारीचाश्रमाचें वर्णन म्हणजे भव्योदात्ततेचा एक उज्ज्वल नमुना आहे. तपाची इतकी उदात्तता कोणत्याहि कवीनें वर्णन केलेली नसेल. कालिदास म्हणतो, " या ठिकाणचे ऋषि कल्पवृक्षाच्या छायेखालीं बसून केवळ वायु भक्षण करून तप करतात. सुवर्णकमलाच्या परागांनीं तांबुस झालेल्या पाण्यानें ते सर्वदा स्नान करतात. देवांगना सन्निध असून रत्न-शीलांवर बसलेले हे मुनि इंद्रियसंयम करतात. हें सर्व पाहून असें आश्चर्य वाटतें कीं, इतर सामान्य मुनि जें वांच्छितात तें सर्व यांच्या-जवळ असून हे कोणत्या फलाकरितां असें तप करीत असावेत बरें ? " ( शाकुंतल : ७.१२ )

एकमेकांपासून दुरावलेल्या शकुंतला-दुष्यन्ताची भेट येथेंच झाली असून त्यांचीं मन:शल्यें येथेंच दूर झालीं. दुष्यन्त आणि भरत या पितापुत्रांची गांठ येथेंच पडली आणि येथेंच त्या पति-पत्नींचें कायमचें मनोमीलन झालें.

'विक्रमोर्वशीयां'तील पहिल्या अंकामधल्या महत्त्वाच्या घटनेचें एक स्थळ कालिदासानें हेमकूट शिखराच्या जवळचेंच कल्पिलेलें आहे. उर्वशी नांवाची इंद्राची अप्सरा कुबेरभवनाहून आपल्या

सख्यांसह परत येत असतां वाटेंत तिला केशी नांवाच्या दानवानें कैद केलें व आकाशमार्गानें तो तिला घेऊन गेला. त्यामुळें दुःखित झालेल्या तिच्या बरोबरीच्या अप्सरा साहाय्यासाठीं आक्रंदन करूं लागल्या. त्याच वेळीं सूर्योपस्थान करून परत येत असणाऱ्या पुरुरव्यानें तें त्यांचें आक्रंदन ऐकलें व तो त्या अप्सरांना हेमकूट पर्वतावर थांबावयास सांगून आपण केशीच्या पाठलागास गेला. केशीला मारून कांहीं वेळानें तो उर्वशीसह परतला आणि हेमकूटावर सर्वांची भेट झाली. उर्वशीच्या मनांत पुरुरव्याबद्दलचें प्रेम येथेंच अंकुरित झालें.

चित्ररथ आणि पुरुरवा यांची भेट येथेंच झाली. एखादा अद्भुतरम्य प्रसंग घडवून आणावयाचा म्हणजे तो हिमालयावरच अशी कालिदासाच्या मनाची ओढ आहे. पुरुरव्याला उर्वशीची प्राप्ति झाल्यानंतर अमात्यावर राज्यकारभार सोंपवून तो जो विलासांसाठीं जातो तो गंधमादन वनांत. गंधमादन हें वनहि हिमालयांतच आहे असें महाभारतावरून स्पष्ट होतें. आणि गंधमादन वन हें विलासाला अत्यंत योग्य असें स्थळ आहे असें कालिदासाचें मत आहे. याच प्रदेशांत मंदाकिनीच्या वाळवंटांत उदयवती नांवाची कोणी एक विद्याधर युवती वाळूचे किल्ले करून खेळत होती असेंहि कालिदासानें जातां जातां सांगितलें आहे.

त्याच प्रदेशांत कुमारवन नांवाचें एक अरण्य होतें. त्या ठिकाणीं कुमार कार्तिकेय रहात असे. या वनामध्यें कोणीहि स्त्री प्रवेश करीत नसे. कोणी असा प्रवेश केलाच तर तिचें रूपान्तर लतेंत होई. रागावलेली उर्वशी या वनांत शिरली व तिचें लतेंत रूपान्तर झालें. पुरुरव्यानें तिचा अनेक प्रकारें शोध केला व

संगमणीय मण्याच्या साहाय्यानें अखेरीस पुरुरवस् व उर्वशी यांचें मीलन याच प्रदेशांत झालें. ह्याप्रमाणें कालिदासानें आपल्या सात कलाकृतींपैकीं पांच कलाकृतींतील घटना हिमालयावरच घडवून आणलेल्या आहेत.

हिमालयाची एवढी ओढ कालिदासाला असण्याचें कारण एक संशोधक असें देतात – कालिदास शैवमताचा आणि काश्मीरचा रहाणारा. निदान त्याच्या पूर्वायुष्याचा कांहीं काल तरी काश्मिरांत गेला होता. काश्मीर हा हिमालयाचाच भाग. काश्मिरांतील अद्भुत सृष्टिसौंदर्यानें कालिदासाचें मन मोहित केलें होतेंच. म्हणून या काश्मिरामुळें शिव-पार्वतीचें निवासस्थान असलेला खुद्द हिमालयच कालिदासाच्या फार मोठ्या आकर्षणाचा विषय झाला.

कालिदासासारखे महाकवि राहोत; साधे सुभाषितकार सुद्धां हिमालयांत असणाऱ्या दिव्यौषधींचा जातां जातां कसा सहज उल्लेख करतात तो पहा.

कोणी एक पांथस्थ ऐन पावसाळ्याच्या तोंडाशीं आपल्या प्रियेपासून दूर प्रवासांत आहे. आकाशांत डंवरलेले निळे ढग त्याच्या दृष्टीस पडले. प्रियेच्या भेटीची अत्यंत उत्कंठा त्याला लागली. पण करतो काय बिचारा ? या उत्कंठेवरील खात्रीचें औषध जी प्रिया ती होती शेंकडों योजनें दूर व उत्कंठारोग तर मानगुटीस बसलेला. तेव्हां त्याला हिमालयाची आठवण झाली. तो म्हणाला, “ संतापलेला साप बसावा डोक्यावर आणि सर्प-विषावरचें दिव्य औषध मात्र असावें हिमालयांत. तसा हा प्रकार होतो आहे. ”

उपरि पयोधरमाला, दूरे दयिता, किमेतदापतितम् ।
हिमवति दिव्यौषधयः कोपाविष्टः फणी शिरसि ॥

■ ■ ■

## महाकवि भारवीचें वैशिष्ट्यपूर्ण वर्णन

महाकवि भारवि यानें आपल्या 'किरातार्जुनीय' या महाकाव्यांत केलेलें हिमालयाचें वर्णन वैशिष्ट्यपूर्ण आहे. व्यास आणि धर्मराज यांच्या आज्ञेवरून अर्जुन हिमालय पर्वतांत जातो व तेथें तपश्चर्या करून किरातवेषधारी श्रीशंकराशीं लढून त्याला प्रसन्न करतो आणि त्याजकडून पाशुपतास्त्र मिळवितो, या वनपर्वांतील अध्याय ३३ ते ४१ यांमध्यें सांगितलेल्या कथेच्या आधारानें भारवीनें आपलें 'किरातार्जुनीय' हें महाकाव्य रचिलें आहे. भारवीचा काळ इ. स. ६ व्या शतकाचा उत्तरार्ध आहे. एका यक्षासमवेत अर्जुन हिमालय पर्वतावर आला तेव्हां त्याला तो पर्वत कसा दिसला याचें वर्णन 'किरातार्जुनीया'च्या पांचव्या सर्गांत आहे. त्यांतून हिमालयाचें भव्योदात्त दर्शन घडतें तें असें –

हिमालय या नगाधिराजाचीं शिखरें आकाशांत इतकीं उंच गेलीं होतीं कीं, मेरु पर्वतावर विजय मिळविण्यासाठीं किंवा एके जागीं बसल्याबसल्याच सर्व दिशा अवलोकन करण्यासाठीं अथवा आकाशमार्ग आक्रमून टाकण्यासाठींच यानें आपला माथा इतका उंचावला आहे कीं काय असें अर्जुनास वाटलें.

अथ जयाय नु मेरु महीभृतो रभसया नु दिगन्तदिदृक्षया ।
अभिययौ स हिमाचलमुच्छ्रितं समुदितं नु विलङ्घयितुं नभः ॥
( किरात : ५.१ )

हा हिमालय पर्वत उंच व विशाल असल्यानें त्याचा एक भाग सूर्यप्रकाशामुळें तर त्याचा दुसरा भाग रात्रीच्या अंधकारामुळें व्याप्त झालेला असतो. त्यामुळें तो हुबेहूब शंकराप्रमाणें दिसतो. कारण शंकराच्या शरीराचा पूर्वभाग हास्यानें धवल दिसत असून त्याचा पृष्ठभाग गजचर्माच्या आच्छादनामुळें काळा दिसतो. पृथ्वी, आकाश आणि स्वर्गलोक या ठिकाणीं रहाणारांची हिमालयावर वसति आहे. यावरून असें वाटतें कीं, भगवान् शंकरानें आपलें अलौकिक योगसामर्थ्य प्रकट करण्यासाठीं या हिमालयाला अखिल विश्वाचा प्रतिनिधि केलें आहे.

हिमालयांतील लतागृहामध्यें देवांगनांचा विलास चाले. त्या लतागृहावर रत्नांच्या प्रकाशासारखा प्रकाश पडत असे. त्यावरून असें वाटे कीं, येथें निसर्गानें सुंदर विलासनगरेंच निर्माण केलीं आहेत. हिमालयाच्या शिखराभोंवतीं जमलेल्या ढगांतून पाणी गळून गेल्यामुळें ते पांढरे शुभ्र दिसत होते. तसेंच त्यांमधून विजाहि चमकत नव्हत्या, गर्जनाहि होत नव्हती आणि ते पर्वताच्या मध्यभागाजवळ विरळपणें वावरत होते. त्यावरून असें वाटे कीं, इंद्रानें एकदां तोडलेले पंख हिमालयाला पुन्हा फुटले आहेत.

अविरतोज्झितवारिविपाण्डुभिर्विरहितैरचिरद्युतितेजसा ।
उदितपक्षमिवारतनिःस्वनैः पृथुनितम्बविलम्बिभिरम्बुदैः ॥
( किरात : ५.६ )

हिमालयांतील नद्यांच्या दरडा तेथें असलेले मत्त हत्ती आपल्या गंडस्थळाच्या ढुशांनीं कोसळून टाकीत असत. हिमालय पर्वतावर रात्रीं तथील वनस्पति सर्वत्र प्रकाश पाडीत, तो आकाशास जाऊन भिडे. त्यामुळें शंकराच्या गणांना शंकरानें पूर्वीं त्रिपुरें जाळलीं त्याची आठवण होई. हिमालयाच्या शिखरावरून वेगवान नद्या खालीं दरींत कोसळत होत्या. विशेषतः भागीरथीच्या प्रवाहाचें पाणी खालीं खडकावर आपटल्यामुळें त्याचे तुषार उंच उडत व वाटे कीं, ही जाह्नवी या पर्वतराजावर श्वेत चामरेंच ढाळीत आहे.

हिमालयावर आल्यानंतर तेथील प्रशांत रमणीयता पाहून ही केवळ भोगभूमि नसून तें एक मोक्षक्षेत्र आहे असें अर्जुनाला वाटलें. कारण या ठिकाणीं आल्यावर जन्मजरेच्या पलीकडे असणारें जें ब्रह्मपद ते मिळविण्याची इच्छा मानवाच्या मनामध्यें उत्पन्न होते.

**वीतजन्मजरसं परं शुचि ब्रह्मणः पदमुपैतुमिच्छताम् ।**
**आगमादिव तमोपहादितः संभवन्ति मतयो भवच्छिदः ॥**

(किरात : ५.२२)

हत्तींनीं आपलीं गंडस्थळें हिमालयांतील उंच झाडांना घासलेलीं होतीं. त्या ठिकाणीं हत्तीच्या गंडस्थळांतील मदानें आम्रमंजिरीसारखा वास येत होता. त्यायोगें कोकिळांना उन्माद चढला व भ्रमर तेथें चिकटले, आणि मग झालें काय, तर शरद्-ऋतूंतहि वसंताची शोभा दिसूं लागली. हिमालयांत स्थलकमलांच म्हणजे जमिनीवर उगवणाऱ्या कमलांचे ताटवे होते. त्या कमल-पुष्पांतील पिवळसर पराग वावटळीनें स्तंभाचा आकार धरून उंचपर्यंत उडत होते. बऱ्याच उंचीवर सुटलेल्या वाऱ्याच्या दुसऱ्या

झोताबरोबर त्या स्तंभावरचे पराग मंडलाकार फिरत होते. त्यामुळें पहाणाऱ्यास वाटे कीं, एक पिवळाधमक सोन्याचा दांडा उभा राहिलेला असून त्यावर सुवर्णछत्रच फिरत आहे! आकाशांत उडणाऱ्या परागांच्या या वर्णनावर भारवीनें केलेली सोन्याच्या छत्राची ( किंवा आतपत्राची ) कल्पना प्राचीन पंडितांना इतकी आवडली आहे कीं, त्यांनीं त्याला 'छत्रभारवी' अशी पदवी बहाल केली आहे. तो श्लोक असा :

**उत्फुल्लस्थलनलिनीवनादमुष्मादुद्धूतः सरसिजसंभवः परागः ।**
**वात्याभिर्वियति विवर्तितः समन्तादाधत्ते कनकमयातपत्रलक्ष्मीम् ॥**

( किरात : ५.३९ )

यात्रेचीं परम पवित्र ठिकाणें म्हणून भारतांत बारा ज्योतिर्लिंगें प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं हिमालयांतील केदार हें एक आहे. त्यामुळेंहि हिमालयाच्या पावित्र्यांत भर पडलेली असून तेथें फार प्राचीन काळापासून आजतागायत यात्रेकरूंची रीघ लागलेली असते. तीं बारा ज्योतिर्लिंगें पुढीलप्रमाणें आहेत.

**सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम् ।**
**उज्जयिन्यां महाकालमोंकारमलेश्वरम् ॥**
**परल्यां वैजनाथं च डाकिन्यां भीमशंकरम् ।**
**सेतुबंधे तु रामेशं नागेशं दारुकावने ॥**
**वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यंबकं गौतमीतटे ।**
**हिमालये तु केदारं घुसृणेशं शिवालये ॥**
**एतानि ज्योतिर्लिंगानि सायंप्रातः पठेन्नरः ।**
**सप्तजन्मकृतं पापं स्मरणेन विनश्यति ॥**

भगवान् शंकराचे श्वशुर दक्ष प्रजापति यांनीं केलेला सुप्रसिद्ध यज्ञ, अपमानानें चिडलेल्या दक्षकन्या सतीनें तेथें अग्नींत केलेलें आत्मार्पण व त्यामुळें रागावलेल्या शंकरानें धाडलेल्या वीर-भद्राकडून झालेला दक्षयज्ञाचा विध्वंस या सर्व महत्त्वाच्या गोष्टीहि हिमालयावरच घडल्याचें सांगतात. दक्षयज्ञाचें स्थान कनखल क्षेत्र हेंच आहे; व याच ठिकाणीं दक्षप्रजापतीचा यज्ञ झाला अशी समजूत आहे. दक्षप्रजापतीच्या यज्ञशाळेंत। योगाग्नीनें याच कनखलांत। सती निजदेह करी भस्मसात्। क्रुद्ध होऊनि पित्यावरी ॥

(कैलासगाथा : २२७)

भागवतपुराणाच्या चौथ्या स्कंदांत दक्षप्रजापति आणि शंकर यांचा हा संघर्ष वर्णन केलेला आहे. ती कथा थोडक्यांत अशी: फार प्राचीन कांळीं प्रजा निर्माण करणाऱ्या प्रजापतीनें एक मोठा यज्ञ आरंभिला. तेथें अनेक महर्षि आणि विष्णुशंकरादि देव यांना पाचारण केलें होतें. ती मंडळी तेथें बसली असतां तेजस्वी दक्ष प्रजापति तेथें आला. तो येतांच शंकराशिवाय इतरांनीं त्याला आदरानें उत्थापन दिलें. शंकर आपल्यापेक्षां वयानें लहान व आपला जांवई असून त्यानें आपला अपमान केला या विचारानें क्रुद्ध झालेल्या दक्षानें त्याला शाप दिला व तो तेथून चालता झाला. सासरे-जांवई यांचें वितुष्ट वाढलें.

पुढें एकदां दक्षानें 'बृहस्पतीसव' नांवाचा एक मोठा यज्ञ आरंभिला. त्या वेळीं त्यानें ब्रह्मर्षि, देवर्षि, पितर व देवता यांना त्यांच्या पत्न्यांसह व सेवकांसह यज्ञासाठीं बोलाविलें; आणि त्यांचा सत्कारहि केला. परंतु दक्षानें शंकरास व त्याची पत्नी व

दक्षाची ज्येष्ठ कन्यका सती तिला मात्र त्यानें आमंत्रण दिलें नाहीं. असें असतांहि शंकराच्या इच्छेविरुद्ध सती दक्षयज्ञांत गेली. पण तिच्याकडे कोणीच लक्ष दिलें नाहीं. या अपमानानें चिडलेल्या सतीनें तेथल्या तेथें अग्नींत आपला देह जाळून भस्म केला. ही बातमी पार्वतीबरोबर गेलेल्या गणांनीं शंकरास सांगितली. ती ऐकतांच शंकरास फार क्रोध आला आणि त्यानें आपल्या मस्तका-वरील एक जटा तोडून ती भूमीवर आपटली. त्याबरोबर सहस्र भुजांचा एक प्रचंड पुरुष निर्माण झाला. त्याचें नांव वीरभद्र. त्याला शंकरानें दक्ष प्रजापतीच्या यज्ञाचा विध्वंस करावयास सांगितलें.

बरोबर शिवगणांची सेना घेऊन वीरभद्रानें दक्षाच्या यज्ञाचा विध्वंस केला. वाट फुटेल तिकडे पुरोहित व देव पळून गेले. वीर-भद्रानें दक्षाचा गळा दाबून त्याचें मस्तक धडापासून तोडून काढलें. हा भयंकर प्रकार पाहून ब्रह्मदेव व इतर सर्व देवमंडळी शंकराचा राग शांत करण्यासाठीं हिमालय पर्वतावर आली. तेथील वृक्ष फुलाफळांनीं बहरलेले असून सर्व जगाला पावन करणाऱ्या नंदा व अलकनंदा या दोन नद्या येथून वहात होत्या. सर्व देवांनीं शंकराची समजूत घातली. तेव्हां सर्वांना बरोबर घेऊन भगवान् शंकर दक्षाच्या यज्ञमंडपांत आले. तेथें त्यांनीं यज्ञमंडप पूर्वीसारखा सज्ज करविला. दक्षाच्या धडाला बोकडाचें मस्तक लावण्यांत आलें; आणि एखादा निजलेला पुरुष जसा जागा होतो त्याप्रमाणें दक्ष तत्काळ उठून उभा राहिला.

दक्षास आपली चूक कळून आली व त्यानें शंकरापाशीं क्षमा-याचना केली. दक्षानें पुन्हां यज्ञ आरंभिला व हें सर्व यज्ञप्रकरण

यथासांग पार पडलें. दक्षकन्या सती हिनें आपलें शरीर जाळून टाकलें होतें. तरी फिरून तिनें हिमालय पर्वताच्या मेना नामक पत्नीच्या उदरीं जन्म घेतला. परमेश्वराची शक्ति जशी पुन्हा परमेश्वराजवळ येते त्याप्रमाणें पार्वतीच्या रूपांत सतीनें पुन्हा शंकरालाच वरिलें व त्याचा गृहस्थाश्रम पूर्वींप्रमाणेंच चालू लागला.

■ ■ ■

## बाणभट्टाचें विलक्षण आकर्षण

कालिदासाप्रमाणें बाणभट्टालाहि हिमालयाचें विलक्षण आकर्षण आहे. कविवर्य बाणभट्ट हा इ. स. ७ व्या शतकांत कनोजचा सम्राट् हर्षवर्धन याच्या पदरीं कवि म्हणून होता. बाणभट्टानें आपल्या 'कादंबरी' नांवाच्या अद्भुत कथेचें मुख्य स्थळ म्हणून कैलासाचा आसमन्त भाग योजिलेला आहे. उज्जयिनी येथील तारापीडाचा पुत्र चंद्रापीड हा या कथेचा नायक. तो दिग्विजय करीत करीत भारताच्या उत्तर सीमेजवळ येतो व तेथें कैलासपर्वताच्या प्रदेशांत रहाणाऱ्या किरातांचें सुवर्णपुर नांवाचें निवासस्थान जिंकतो. ( कैलाससमीपचारिणां किरातांना सुवर्णपुरं नाम निवासस्थानं नातिविप्रकृष्टं पूर्वजलनिधेर्जित्वा जग्राह । ) तेथें असतांना तो एकदां शिकारीस निघाला व कैलास पर्वतावरून खालीं उतरत असलेलें एक किन्नराचें जोडपें त्याला दिसलें. याच्या मागें लागून तो एका अरण्यांत आला. या अरण्यांत मार्ग शोधीत असतां त्याला एक 'अच्छोद' नांवाचें सरोवर दिसलें.

या सरोवराच्या वर्णनांत बाणभट्टाच्या मनांतील हिमालया-बद्दलच्या सर्व रम्य कल्पना एकत्र झालेल्या आढळतील. प्राचीन भारतांतील कवींना हिमालय ही एक मनोहर स्वप्नभूमि (Dream-land) वाटत होती. 'अच्छोद' सरोवराचें वर्णन एक प्रतिनिधिभूत असें समजावें. बाणभट्ट म्हणतो : या सरोवराचें पाणी इतकें स्वच्छ व गार होतें कीं, तेथें कैलास पर्वत द्रवरूप झाला आहे कीं साक्षात् हिमालय पातळ होऊन आला आहे कीं, तेथें चांदण्याचा रस झाला आहे, कीं शंकराचें धवल हास्य पाण्याच्या रूपानें अवतरलें आहे, कीं हिमालयावरील नीलमणी द्रवरूप पावले आहेत असें वाटत होतें. त्या ठिकाणीं शंकराचें नित्य स्नान होई. त्यामुळें शंकराच्या मस्तकावर असलेल्या चंद्राचें अमृत त्या तव्यांत मिसळ-लेलें असे. त्या ठिकाणीं सप्तर्षि स्नानाला येत. सिद्ध वधूंचीं वल्कलें तेथें धुतलीं जात. कुबेराच्या विलासिनी स्त्रिया तेथें जलक्रीडेसाठीं येत. वरुणाचा हंस तेथील कमलतंतु खात असे. शंकराच्या प्रचंड नंदीच्या शिंगांनीं त्या सरोवराचे तट उकरलेले दिसत. इंद्राचा ऐरावत तव्यांतील कमलिनी आपल्या सुव्यांनीं विसकटून टाकी. गणपति तेथें स्नान करीत असल्यानें त्याच्या गंडस्थलांतील मद त्या सरोवराच्या पाण्यांत कालविला जाई. पार्वतीचा सिंह त्या तव्यांतील पाणी पिण्यास येत असे हें त्याच्या वाळूवर उमटलेल्या अत्यंत विशाल अशा पावलांच्या ठश्यांनीं दिसून येई. या ठिकाणीं ब्राह्मी, माहेश्वरी, वाराही इत्यादि सप्तमाता स्नानाला येत. अनेक विद्याधर कमलांच्या फुलांनीं शिवलिंगांचें अर्चन त्या सरोवराच्या वालुकामय प्रदेशांत करीत.

हिमालयावरील याच प्रदेशांत गंधर्वांचें हेमकूट नांवाचें निवासस्थान बाणानें कल्पिलेलें आहे. 'कादंबरी'ची नायिका कादंबरी व उपनायिका महाश्वेता या हिमालयाच्या याच प्रदेशावर रहात होत्या व येथेंच बाणभट्टाच्या कथेंतील महत्त्वाचे अद्भुत प्रसंग घडून आले आहेत. महाश्वेता ज्या शिवलिंगाचें अर्चन करीत होती त्या शिवलिंगाची स्थापना चित्ररथ गंधर्वानें केलेली होती व हिमालयवासी सर्व दिव्य प्रजा तेथें अर्चनाला येई. बाणाच्या मतें हा अद्भुत प्रदेश मानव प्राण्यांना अगम्य असून तेथें विद्याधर, गंधर्व, स्वर्गीय तपस्वी, सिद्ध, यक्ष, गुह्यक, अप्सरा, किन्नर लोकपाल व देवदेवता यांचाच फक्त संचार असे.

तेथें सर्व उपभोग्य वस्तूंची समृद्धि होती. सर्व प्रकारचीं रत्नें, चंद्रकान्तमणी व सुवर्णादि धातु यांनीं तेथील जामदारखाने भरलेले असत. नृत्य, गीत व वाद्य येथें अविरत चाले. अप्रतिम शिल्प मिरवणारे वाडे व उद्यानें जिकडे तिकडे लागून राहिलीं होतीं. स्त्रिया व पुरुष उच्च संस्कृतीनें विनटलेले असून ती संस्कृति त्यांच्या उच्चारांत, आचारांत व विचारांत पदोपदीं दिसून येई. इतकें असूनहि ही सर्व मंडळी भगवान् चन्द्रमौली शंकर व भगवती पार्वती हिच्या चरणीं नम्र असत. तात्पर्य, बाणाच्या कल्पनेंतील आधिभौतिक व आध्यात्मिक संस्कृतीचा भारतीय आदर्श त्यानें या हिमालयाच्या मनोहर प्रदेशांत साकार केला आहे. बाणाची ही काव्यसृष्टि अद्भुत-रम्य ( Romantic ) असली तरी सातव्या शतकांतील सुशिक्षितांना हिमालयाचें केवढें गूढरम्य आकर्षण वाटे याची उत्तम कल्पना तीवरून यते.

■ ■

## भर्तृहरीचें विश्रामस्थान

हिमालय हें केवळ कवींचेंच एक आकर्षण नव्हतें. वैराग्य-संपन्न मुमुक्षूंना हिमालय म्हणजे आपलें ध्येय गांठण्याचें एक उचित स्थळ वाटे. तपस्येला आणि मोक्षप्राप्तीला हिमालयासारखें दुसरें स्थळ नाहीं अशी भारतांतील लोकांची धारणा होती. याचें प्रत्यंतर राजा भर्तृहरीच्या पुढील उद्‌गारांवरून येईल —

गङ्गातरंगहिमशीकर शीतलानि
विद्याधराध्युषितचारुशिलातलानि ।
स्थानानि किं हिमवतः प्रलयं गतानि
यत्सावमानपरपिण्डरतो मनुष्यः ॥

‘भागीरथीच्या लाटांतून उसळणाऱ्या थंडगार जलकणांनीं शीतल झालेलीं आणि जेथील शिलातलावर विद्याधर बसलेले आहेत अशीं हिमालय पर्वतांतील रम्य तपाचीं स्थानें काय नष्ट झालेलीं आहेत काय ? तीं जोंपर्यंत तेथें विद्यमान आहेत तोंपर्यंत अपमान सोशीत श्रीमंतांनीं टाकलेल्या तुकड्यावर जिणें कंठीत रहाण्याची माणसाला जरूर नाहीं.’ या ठिकाणीं भर्तृहरीनें असें स्पष्ट सांगितलेलें आहे कीं, लाचारीचें पराधीन जिणें जगत रहाण्यापेक्षां तडक हिमालयांत जावें व तेथें तपस्या करून जीवनाचें सार्थक करावें.

यानंतर भर्तृहरि मनानें हिमालयांतच गेलेला आहे व तेथें आपण गेलों असतां आपल्याला कशा प्रकारचें सुख लाभेल याची कल्पना तो पुढील श्लोकांत करीत आहे —

गङ्गातीरे हिमगिरिशिलाबद्धपद्मासनस्य ।
ब्रह्मध्यानाभ्यसनविधिना योगनिद्रां गतस्य ॥

किं तैर्भाव्यं मम सुदिवसैर्यत्र ते निर्विशङ्काः ।
कण्डूयन्ते जरठहरिणाः स्वाङ्गमङ्गे मदीये ॥

'हिमालयांत वहाणाऱ्या पवित्र गंगा नदीच्या कांठीं मी आलेलों आहें व तेथील स्वच्छ शिलातलावर मी पद्मासन घालून बसलेलों आहें. ब्रह्मचिंतन करीत असतां योगनिद्रेच्या अवस्थेंत मी आहें. अशा वेळीं तेथील वृद्ध हरीण खुशाल माझ्याजवळ येऊन आपलें अंग माझ्या अंगाला घाशीत आहेत. अहाहा ! असे ते भाग्याचे दिवस मी घालवीत असतांना मला काय बरें सौख्य वाटेल ?'

हिमालय म्हणजे एक आदर्श तपोभूमि ही भारतीयांची श्रद्धा भर्तृहरीनें येथें काव्यमय पद्धतीनें उत्तम व्यक्त केली आहे. भर्तृहरीचा काल ख्रिस्तपूर्व पहिलें व ख्रिस्तोत्तर पांचवें या दोन शतकांच्या दरम्यानचा आहे.

९३०८

अतिप्राचीन श्रुतिकालापासून तों सातव्या आठव्या शतकापर्यंतच्या दीर्घ अवधींत भारतीयांचें लक्ष हिमालयाकडे सारखें कसें लागून राहिलें आहे तें संस्कृत वाङ्मयाच्या आधारें आपण पाहिलें. या भारतीयांत ऋषि, मुनि, इतिहासकार, स्मृतींचे प्रणेते, पुराणकार, महाकवि आणि इतर सुभाषितकार इत्यादि थोर थोर मंडळी होती. याच मंडळींनीं आमचें भारतीय जीवन घडविलें आहे, आणि हे सर्व भारतीय जीवनाचे विधाते एकमतानें हिमालयाकडे एक उदात्त पवित्र, पावन आणि सुंदर वस्तु म्हणून अंगुलिनिर्देश करतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...३२२८०... वि: ...निबंध...
क्रमांक ...९२८८...

REFBK-0013089

REFBK-0013089